पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २०३ ■ शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com



# शारदा खेडकर अकोल्याच्या महापौर

## ▸▸ प्रशासक राज संपले, लोकशाहीची स्थापना ▸▸ शहर सुधार आघाडीची सत्ता
## ▸▸ अपक्ष नगरसेवक आशिष पवित्रकारांचा पाठिंबा पण ठरले 'बंडखोर' !



**किंगमेकर**

प्रतिनिधी ३० जानेवारी

**अकोला:** गेल्या अनेक वर्षांचे प्रशासकीय राज संपत आज महापालिकेत लोकशाही प्रक्रियेच्या सत्तेची स्थापना झाली. अकोला महापालिकेत शहर सुधार आघाडीची सत्ता स्थापन झाली आहे. महापौर पदावर भाजप नगरसेविका शारदा रणजित खेडकर तर उपमहापौर पदावर अमोल गोगे यांचा विजय झाला. शहर सुधार आघाडीने ४५ मते मिळविली. तर विरोधातील महाविकास आघाडी मात्र अपेक्षित संख्याबळ जमवू शकली नाही. विरोधक काँग्रेस, वंचित आणि शिवसेना (उबाठा) यांचे एकूण ३२ नगरसेवक होते. एम आय एम चे तीन नगरसेवक तठस्थ राहिले. त्या नगरसेवकांवर सभागृहात बांगड्या फेकल्याची माहिती व्हायरल झाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे विजयानंतर कुठलाही जल्लोष केला गेला नाही. अपक्ष नगरसेवक आशिष पवित्रकार यांनी भाजपला पाठिंबा दिला. पण, आमदार सावरकर यांनी त्यांना अखेर बंडखोर ठरविले. भाजप नेते रणधीर सावरकर यांनी विजय अग्रवाल यांच्या नेतृत्वात सत्ता स्थापन झाल्याचे गौरवोदगार काढले. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे महानगर अध्यक्ष विजय देशमुख यांच्यामुळे अकोल्यात सत्ता स्थापनेला आम्हाला बळ मिळाल्याचे सांगितले. भाजप निवडणूक प्रभारी विजय अग्रवाल आणि राष्ट्रवादी महानगर अध्यक्ष विजय देशमुख हे सत्ता समीकरणात किंग मेकर ठरले. महापौर पदासाठी शहर सुधार आघाडीच्या (भाजप) नगरसेविका शारदा खेडकर व महाविकास आघाडीच्या शिवसेना (उबाठा) च्या नगरसेविका सुरेखा मंगेश काळे यांच्यात थेट लढत झाली. शारदा खेडकर यांना ४५ मते मिळाली. या मध्ये भारतीय जनता पार्टी ३८, महानगर विकास समिती १, शिवसेना (शिंदे गट) ०१, राष्ट्रवादी (अजित पवार)०१, राष्ट्रवादी (शरद पवार)०३ आणि अपक्ष (आशिष पवित्रकार)०१ यांचे मते मिळाली असे एकूण ४५ मते भाजपला प्राप्त झाले. तर शिवसेना उबाठा च्या सुरेखा मंगेश काळे यांना काँग्रेस २१ नगरसेवकांनी मते दिली. शिवसेना (उध्दव ठाकरे)०६, वंचित बहूजन आघाडी च्या ५ नगरसेवकांनी असे एकूण ३२ मते मिळाली. तर एम आय एम च्या तीन नगरसेवकांनी तठस्थ राहण्याची भूमिका आज निभावली.

सभेचे पिठासीन अधिकारी वर्षा मीना, मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने, अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, नगर सचिव अमोल डोईफोडे, सभेचे गणना अधिकारी मनपा उपायुक्त विजय पारतवार, दिलीप जाधव, निवडणूक विभाग प्रमुख अनिल बिडवे यांनी कामकाज पाहिले. पोलिस अधिक्षक अर्चित चांडक यांच्या नेतृत्वात तगडा पोलिस बंदोबस्त होता.





उपमहापौर अमोल गोगे

### शहर सुधार आघाडी

| | |
|---|---|
| ▸▸ भारतीय जनता पार्टी | ३८ |
| ▸▸ महानगर विकास समिती | ०१ |
| ▸▸ शिवसेना (शिंदे गट) | ०१ |
| ▸▸ राष्ट्रवादी (अजित पवार) | ०१ |
| ▸▸ राष्ट्रवादी (शरद पवार) | ०३ |
| ▸▸ अपक्ष (आशिष पवित्रकार) | ०१ |
| ▸▸ एकूण | ४५ |

### महाविकास आघाडीचे संख्याबळ

| | |
|---|---|
| ▸▸ काँग्रेस | २१ |
| ▸▸ शिवसेना (उध्दव ठाकरे) | ०६ |
| ▸▸ वंचित बहूजन आघाडी | ०५ |
| ▸▸ एकूण | ३२ |

| | |
|---|---|
| ▸▸ **तटस्थ** | |
| ▸▸ एम आय एम | ०३ |



- ▸▸ अकोला महापालिकेत शहर सुधार आघाडीची सत्ता
- ▸▸ भाजपने संख्याबळ जमविले, विजय अग्रवाल ठरले किंगमेकर
- ▸▸ शहर सुधार आघाडीला दोन्ही राष्ट्रवादीचा पाठिंबा
- ▸▸ अपक्ष नगरसेवक आशिष पवित्रकार यांचा भाजपला पाठिंबा
- ▸▸ महापौर पदी शारदा रणजित खेडकर विराजमान
- ▸▸ शहर सुधार आघाडीला ४५ नगरसेवकांचा पाठिंबा
- ▸▸ अपक्ष नगरसेवक आशिष पवित्रकार भाजपसोबत गेले
- ▸▸ पवित्रकार यांना फोनमुळे भाजपला पाठिंबा दिल्याची माहिती

### निकालापूर्वीच भाजपचा चेंबरवर ताबा

निवडणूक प्रक्रिया पूर्ण होऊन अधिकृत घोषणा होण्यापूर्वीच भाजप कार्यकर्त्यांनी आणि नेत्यांनी महापौर दालनाचा ताबा घेतला होता. नवनियुक्त महापौरांच्या स्वागताच्या नावाखाली भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचे फोटो दालनात लावले गेले. प्रशासक राजवटीनंतर सत्ता काबीज करण्यासाठी भाजपमध्ये कमालीची उत्सुकता दिसून आली, ज्यामुळे अधिकृत प्रक्रियेची प्रतीक्षा न करता हा ताबा घेण्यात आला.

### 'दादांच्या' निधनाचे सावट

भाजपची सत्ता निश्चित झाली आणि शारदा खेडकर महापौर झाल्या असल्या, तरी शहरात जल्लोष दिसून येणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित दादा यांच्या निधनामुळे पक्षाने कोणत्याही प्रकारचा विजयोत्सव साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे विजयाची ही घोषणा काहीशी शांततेत पार पडले. कुठलाही जल्लोष, बुके, गुलाल यावेळी उधळला गेला नाही.

### 'कोमात' गेलेले विरोधक

काँग्रेस, शिवसेना (उबाठा) आणि वंचित बहुजन आघाडी यांनी सत्ता स्थापनेचा प्रयत्न केला होता, पण आशिष पवित्रकार आणि राष्ट्रवादीच्या (दोन्ही गट) मदतीने भाजपने जो 'खेळ' केला, त्यातून सावरणे विरोधकांसाठी कठीण झाले आहे.

### हे नगरसेवक राहिले तटस्थ

तठस्थ असलेले सदस्य प्रभाग क्रं. २ अ सीमा अंजुम शेख अनीस, प्रभाग क्रं. २ क मैमूना बी अब्दुल रशीद, प्रभाग क्रं. २ ड सै. रहीम सै. हाशम

### निवडणूक प्रक्रियेपासून पत्रकार दूर का

अकोला महानगरपालिकेत महापौर आणि उपमहापौर निवडीच्या ऐतिहासिक क्षणी पत्रकारांना सभागृहाबाहेर ठेवण्याचा निर्णय अत्यंत वादग्रस्त ठरला आहे. प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात यावरून अनेक तर्क-वितर्क लावले जात आहेत. अनेकदा निवडणूक अधिकारी 'सुरक्षा आणि सुव्यवस्थेचे' कारण पुढे करतात. सभागृहात नगरसेवकांची संख्या, त्यांचे मतदान आणि संभाव्य गोंधळ टाळण्यासाठी 'केवळ सदस्यांनाच प्रवेश' असा नियम लावला जाण्याची शक्यता असते. मात्र, लोकशाहीत माध्यम प्रतिनिधींना अशा प्रक्रियेपासून दूर ठेवणे हे दुर्मिळ मानले जाते.अकोल्यात त्रिशंकू स्थिती असल्याने आणि शेवटच्या क्षणापर्यंत आकड्यांची जुळवाजुळव सुरू असल्याने, मतदान प्रक्रियेचे थेट चित्रीकरण टाळण्यासाठी हा प्रयत्न असू शकतो. महापालिकेत पत्रकारांसाठी स्वतंत्र गॅलरी किंवा 'लाईव्ह फीड'ची (थेट प्रक्षेपण) व्यवस्था करणे अपेक्षित होते. मतदान सुरू असताना त्यांना आत न सोडणे, हे प्रशासकीय पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभे करणारे आहे.







### महापौर उपमहापौर पदासाठीही विकासासाठी मतदान : आमदार रणधीर सावरकर



महापालिका निवडणुकीत तसेच आज झालेल्या महापौर उपमहापौर पदाच्या निवडणुकीत देखील विकास हाच मुद्दा महत्त्वाचा ठरला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेने वातावरण सेट झाले होते. त्याचा शहर सुधार आघाडीला ला झाला असे आमदार रणधीर सावरकर आरआरसी नेटवर्कशी बोलताना म्हणाले. मागच्या सात आठ वर्षात आपण केलेली विकास कामे लोकांना भावली. निवडणुकीच्या काळात देवेंद्र फडणवीस यांची सभा झाली. देवेंद्रजींवर अकोलेकरांचा विश्वास आहे. तसेच मागील काळात नगरसेवकांनी उत्तम कार्य केले. भाजप विरोधात सर्वांनी एकत्र येण्याचा प्रयत्न झाला पण तो अयशस्वी ठरला. शहर सुधार आघाडीच्या माध्यमातून राष्ट्रवादीचे विजयभाऊ देशमुख, शिंदे गटाच्या विरकताई, सुनील मेश्राम, राष्ट्रवादी शरद पवार यांची साथ मिळाली. आमचा एक बंडखोर होता त्याचेही मतदान झाले. आमच्याकडे विजय अग्रवाल यांच्या सारखा प्रामाणिक आणि मॅथेमॅटिक्स ज्याला समजते असे व जयंत मसने यांची महत्त्वाची भूमिका राहिली. संजय भाऊ धोत्रे, कै. गोवर्धन शर्मा यांचे आशीर्वाद यशामागे आहे असे आमदार रणधीर सावरकर म्हणाले.

### अकोल्याच्या विकासाला प्राधान्य : खासदार अनुप धोत्रे



शहर सुधार आघाडीचे महापौर आणि उपमहापौर ४५ मते घेऊन विजयी झाले. ४१ मते आमच्याकडे होती. चार मतांची साथ मिळाली. आणि संख्याबळ ४५ झाले. आता केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून अकोला शहराचा विकास करू अशी ग्वाही खासदार अनुप धोत्रे यांनी दिली. विजयाबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

### शहराचा सर्वांगीण विकास हेच ध्येय -विजय अग्रवाल



शहरातील जनतेने विकासाला मत दिले असून, त्यांचा मी आभार आहे. त्यांच्यामुळेच शहर सुधार आघाडीची सत्ता स्थापन झाली आहे. आता आ. रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वाच्या माध्यमातून केंद्र व राज्यातून निधी आणून शहराचा सर्वांगीण विकास करण्यात येईल. आता राजकरण बंद झाले असून, केवळ विकासाला प्राधान्य राहणार आहे. त्यामुळे विरोधकांनीही विकास कामांना विरोध न करता सहकार्य करावे, असे आवाहनही विजय अग्रवाल यांनी विजयानंतर प्रतिक्रिया देताना केले आहे.



सिटी न्यूज अमरावती
शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## केंद्रप्रमुख पदासाठी विभागीय स्पर्धा परीक्षा; ३ व ४ फेब्रुवारीला ऑनलाइन परीक्षा

**अमरावती :** महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हापरिषद मधील कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी समूह साधन केंद्र समन्वयक केंद्र प्रमुख मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०२५ या परीक्षेचे ऑनलाईन पद्धतीने ३ फेब्रुवारी व ४ फेब्रुवारी या कालावधीत प्रत्येक दिवशी तीन सत्रामध्ये आयोजन करण्यात आले आहे. या परीक्षेचे प्रवेश पत्र ऑनलाइन पद्धतीने २९ जानेवारीपासून www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे, याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. परीक्षार्थी उमेदवारांनी www.mscepune.in या संकेतस्थळास भेट द्यावी. प्रवेशपत्र डाउनलोड करण्यासाठी येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी १८००२२२३६६/ १८००१०३४५६६ या हेल्पलाइन नंबरवर संपर्क साधावा.

# ढगाळ हवामानाचा शेतीला फटका

## ◆ कांदा, गहू, लसूण व चारा पिकांवर रोगांचा वाढता प्रादुर्भाव

प्रतिनिधी ३० जानेवारी



**अमरावती :** गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यासह विदर्भात ढगाळ हवामान कायम असल्याने शेती पिकांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होताना दिसत आहे. सततची आर्द्रता, सूर्यप्रकाशाचा अभाव आणि थंड-उष्णतेतील चढउतार यामुळे कांदा, गहू, लसूण तसेच चारा पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्पादन घटण्याची तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.

कांदा पिकावर करपा, बुरशीजन्य रोग आणि पानांवर डाग पडण्याचे प्रमाण वाढले आहे. काही भागांत कांद्याची पाने पिवळी पडून वाळण्याची लक्षणे दिसून येत आहेत. याचा थेट परिणाम कांद्याच्या वाढीवर होत असून, उत्पादनात घट होण्याची शक्यता कृषी तज्ज्ञांकडून वर्तवण्यात येत आहे.

गहू पिकालाही ढगाळ हवामानाचा फटका बसत असून, तांबेरा (रस्ट) आणि करपा रोगाचा धोका वाढला आहे. वेळेवर नियंत्रण न केल्यास कणसांवर परिणाम होऊन दाण्यांची गुणवत्ता आणि वजन कमी होण्याची भीती आहे. लसूण पिकातही पाने कुजणे, बुरशीजन्य रोग आणि वाढ खुंटण्याच्या समस्या समोर येत आहेत.

चारा पिकांवरही रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याने जनावरांच्या खाद्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. चाऱ्याची गुणवत्ता घसरल्यास दुग्ध उत्पादनावरही त्याचा परिणाम होऊ शकतो, अशी शेतकऱ्यांची चिंता आहे.

कृषी विभागाने शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, पिकांची नियमित पाहणी करणे, गरजेनुसार फवारणी करणे आणि तज्ज्ञांचा सल्ला घेण्याचे सुचवले आहे. तसेच रोगांचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी योग्य कीटकनाशक व बुरशीनाशकांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ढगाळ हवामान कायम राहिल्यास नुकसान वाढण्याची शक्यता असून, पुढील काही दिवस शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. त्यामुळे शेतकरी बांधवांनी वेळीच खबरदारी घेऊन पिकांचे संरक्षण करावे, असे आवाहन कृषी तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात अजितदादा पवार यांना श्रद्धांजली

**अमरावती:** उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे बारामती येथे झालेल्या विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. या धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात शोककळा पसरली असून, आज जिल्हाधिकारी कार्यालयात शोकसभा आयोजित करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दाणेज, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, विवेक जाधव, प्रसेनजित चव्हाण, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, जिल्हा खनीकर्म अधिकारी प्रणिता चापले, अधिक्षक निलेश खटके आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी अजितदादा पवार हे शिस्तीप्रिय होते. त्यांचा वक्तशिरपणा सर्वांच्या परिचयाचा होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अजितदादांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# चिखलदरा वन प्रशिक्षण संस्थेत महारक्तदान व आरोग्य तपासणी शिबीर

## ◆ वनरक्षकांनी रक्तदानातून दिला राष्ट्रसेवेचा संदेश

प्रतिनिधी ३० जानेवारी



**चिखलदरा :** भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्थेमध्ये महारक्तदान व मोफत आरोग्य तपासणी शिबिर यशस्वी पार पडले. वनरक्षकांनी रक्तदानातून राष्ट्रसेवेचा संदेश दिला. या सामाजिक उपक्रमात वन विभागाच्या प्रशिक्षणार्थी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून समाजोपयोगी कार्याचा आदर्श निर्माण केला. या शिबिरात अमिक्षित वनरक्षक तुकडी क्रमांक ६३, लिपिक व लेखापाल पायाभूत प्रशिक्षणार्थी, तसेच संस्थेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सकाळी १० वाजता सुरू झालेल्या या उपक्रमात अनेक रक्तदात्यांनी रक्तदान करून 'रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून अधोरेखित केला. कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या संचालिका कु. मुक्ताबाई टेकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यशस्वी आयोजनासाठी कवायत शिक्षक सुधीर भाऊराव आकेवार यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच कु. शिल्पा घाटे (वनरक्षक), नितीन बघाय, महादेव धुळे यांच्यासह संपूर्ण कर्मचारीवृंदाने परिश्रम घेतले. ग्रामीण रुग्णालय, चिखलदरा येथील वैद्यकीय अधीक्षक व त्यांच्या संपूर्ण वैद्यकीय चमूने रक्तसंकलन व आरोग्य तपासणीसाठी तांत्रिक व वैद्यकीय सहकार्य पुरवले. त्यांच्या योगदानाबद्दल संस्थेच्या वतीने विशेष कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी बोलताना चिखलदरा वन प्रशिक्षण संस्थेत संचालिका कु. मुक्ताबाई टेकाळे म्हणाल्या की, "प्रजासत्ताक दिन हा केवळ उत्सव नसून कर्तव्याची जाणीव करून देणारा दिवस आहे. वनरक्षक व शासकीय कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणासोबतच सामाजिक जबाबदारीचे भान ठेवणे आवश्यक आहे. आजचे रक्तदान अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचविण्यास मोलाचे ठरेल.

# मेळघाटात समाजपरिवर्तनाची पायाभरणी; चिचखेडा ग्रामपंचायतीचे बालविवाहबंदी व कन्या प्रोत्साहनाचे अभिनव ठराव

प्रतिनिधी ३० जानेवारी



**अमरावती :** मेळघाटातील चिचखेडा ग्रामपंचायतीने समाजहितासाठी महत्त्वाचे आणि अभिनव ठराव मंजूर करून आदर्श ग्राम योजनेच्या दिशेने ठाम पावले उचलली आहेत. बालविवाह रोखणे आणि कन्या जन्माला प्रोत्साहन देणे, या उद्देशाने ग्रामपंचायतीने घेतलेले निर्णय सध्या परिसरात चर्चेचा विषय ठरत आहेत.

ग्रामसभेत सर्वानुमते ठराव मंजूर करून गावात बालविवाह होऊ नये यासाठी कडक भूमिका घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बालविवाहाची माहिती मिळताच ग्रामपंचायत, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या व संबंधित यंत्रणांच्या माध्यमातून तातडीने कारवाई केली जाणार आहे. यासोबतच पालकांमध्ये जनजागृती करून कायदेशीर व सामाजिक परिणाम समजावून सांगण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच गावात कन्या जन्माला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुलीच्या जन्मानंतर कुटुंबाचा ग्रामपंचायतीकडून सन्मान करण्यात येणार असून, शिक्षण व आरोग्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. 'मुलगी जन्माला येणे हे अभिमानाचे' असा सकारात्मक संदेश गावात पसरवण्याचा प्रयत्न ग्रामपंचायतीकडून केला जात आहे. या उपक्रमांमुळे सामाजिक बदल घडून येतील आणि गावाचा सर्वांगीण विकास होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. चिचखेडा ग्रामपंचायतीचे हे निर्णय इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरण्याची शक्यता आहे. आदर्श ग्राम योजनेच्या दिशेने मेळघाटातील चिचखेडा गावाची वाटचाल सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.

# तोंगलाबाद येथे हजार विद्यार्थ्यांनी वाहिली 'अजितदादांना' भावपूर्ण श्रद्धांजली

## ◆ माजी विद्यार्थ्यांचे उद्‌घाटन संपन्न; ३० जानेवारीला सांज आठवांची कार्यक्रम

प्रतिनिधी ३० जानेवारी



**दर्यापूर :** तालुक्यातील तोंगलाबाद येथील राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे माजी विद्यार्थी संघाच्या वतीने २९ जानेवारी भव्य माजी विद्यार्थी मेळाव्याचे उद्घाटन शिक्षक आमदार किरण सरनाईक यांच्या हस्ते व जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

यावेळी पाच हजार विद्यार्थ्यांचा भव्य माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला आहे.यावेळी विद्यार्थ्यांचा भव्य कुंभमेळा याठिकाणी भरला आहे.

सकाळच्या सत्रात माजी विद्यार्थी मेळाव्याचे उद्‌घाटन समारंभाच्या सुरवातील राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पाच हजार विद्यार्थांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.यावेळी आठवांचा स्मृतीगंध या स्मरणिकेचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लोक कल्याण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीरंग पाटील अरबट उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठी चित्रपट निर्माते छत्रुघ्न बिडकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी व माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सदानंद जाधव व आयोजन समिती सदस्य व प्रमुख मान्यवर उपस्थित होते. तर दुपारच्या सत्रात भोजन नंतर २ वाजता पासून माजी विद्यार्थी परिसंवाद, चर्चासत्र, मनोगत कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

३० जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात सकाळी ७ वाजता प्रभात फेरी, ग्रंथ दिंडी व ग्राम स्वच्छता कार्यक्रम होईल. सकाळी १० वाजता गुरुवंदना व ऋण परीस्पर्शाचे हा गुरुंचा सन्मान कार्यक्रम साजरा होईल. दुपारी १२ वाजता माजी विद्यार्थी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम व माजी विद्यार्थी सभागृह व व्यायाम शाळा भूमिपूजन संपन्न होणार आहे.मराठी हास्य कलाकार यांचा गीत, संगीत, नृत्य, विनोद, काव्य व निवेदन यांची सांगड घालणारा 'सांज आठवांची' हा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम संध्याकाळी ७ वाजता संपन्न होईल.

यामध्ये रंगभूमीवरील सुप्रसिद्ध हास्य कलाकार भारत गणेशपुरे, गौरव मोरे, तसेच अभिनेत्री हेमांगी कवी आणि अंकुर वाढवे यांच्या अदाकारीचा आस्वाद प्रेक्षकांना घेता येणार आहे.

या सांस्कृतिक कार्यक्रमाचा लाभ नागरिकांनी व माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन आयोजक माजी विद्यार्थी संघ व आयोजन समिती, राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, तोंगलाबाद यांनी केले आहे.

# अमरावती शहर गुन्हे शाखे कडुन घरफोडी करणारा रेकॉर्ड वरील गुन्हेगार ताब्यात

## ◆ त्याचे कडुन एकुण १० घरफोडीचे गुन्हे उघडकीस २०,७३,०००/- रू. रकमेचे सोने, चांदी व रोखरक्कम जप्त

प्रतिनिधी ३० जानेवारी



**अमरावती :** पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी अमरावती शहरातील घरफोडी चे गुन्हे उघडकिस आणणे बाबत आदेशीत केलेवरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही केली आहे.

पो.स्टे. राजापेठ येथील अप क. ३७/२०२६ कलम ३३१ (४), ३०५ (अ) भा. न्या. सं प्रमाणे दाखल असुन सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना सदरचा गुन्हा हा रेकॉर्ड वरील घरफोडी करणारा गुन्हेगार पंकज गोंडाणे रा. चवरे नगर अमरावती याने केला असल्याचे तपासा दरम्यान निष्पन्न झाले सदर आरोपी हा घरफोडी चोरी करणारा सराईत गुन्हेगार असुन त्याचे वर घरफोडी व चोरीचे अमरावती शहर व विविध शहरामधे ४० ते ५० गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपीचे कोणतेही निश्चित असे राहण्याचे ठिकाण नसुन तो मोबाईलचाही वापर करत नाही तसेच तो गुन्हे केल्या नंतर रेल्वेने अमरावती शहरातुन निघुन जातो व मुंबई, ठाणे, संभाजी नगर, भुसावळ, कल्याण अशा विविध शहरामधे जावुन स्वतःचे अस्तीत्व लपवुन राहतो आज दिनांक २८/०१/२०२६ रोजी गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक माहीती मिळाली की, आरोपी पंकज गोंडाणे हा कल्याण येथुन रेल्वेने नागपुर ला जाणार आहे अशा मिळालेल्या माहिती वरून गुन्हे शाखेचे पथक हे भुसावळ येथे जावुन सदर रेल्वे मध्ये दाखल झाले व त्यांनी बडनेरा रेल्वे स्टेशन पर्यंत संपुर्ण रेल्वेची पाहणी करून आरोपी हा आरक्षीत डब्यांमध्ये मालखेड जि. अमरावती रेल्वे स्टेशन च्या जवळ पास मिळुन आला तेव्हा त्याला लागलीच ताब्यात घेवुन त्यास गुन्हे शाखा कार्यालयात आणुन त्याची कसुन चौकशी करण्यात आली. त्यावरून आरोपी याने अमरावती शहरामधे एकुण १० घरफोडी चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली काही मुददेमाल हा त्याचा मित्र सागर गोगटे याच्याकडे दिल्याचे सांगीतले. त्यावरून सागर गोगटे रा. अमरावती यास लागलीच ताब्यात घेवुन त्याची देखील कसुन चौकशी करण्यात आली त्याने कबुली दिली वरून पंकज गोंडाणे व सागर गोगटे याचे ताब्यातुन घरफोडीच्या गुन्हयातील मुददेमाल जप्त करून खालील गुन्हे उघडकीस आणले आहेत. पंकज राजु गोंडाणे वय २८ रा. चवरे नगर, अमरावती, सागर जनार्धन गोगटे वय ३० वर्ष रा. गांधी चौक अमरावती इतर फरार ३ आरोपी असून ताब्यात घेतलेला मुद्देमाल ११० ग्रॅम सोन्याची लगड कि.अ. ,१५,०००/- रू. चा मुद्देमाल ५०० ग्रॅम चांदीची लगड कि.अ. १,९०,०००/- रू चा मुददेमाल रोख रक्कम ६८,०००/- असा एकुण अं. २०,७३,०००/- रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला. सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (गुन्हे), रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे शाखा) शिवाजी बचाटे, यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात स. पो.नि. महेश इंगोले, पोलीस अंमलदार पोहेकॉ गजानन ठेवले, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, मंगेश परिमल, विशाल वाकपांजर, नापोका मिर्झा नईम बेग, विकास गुडधे, पोकॉ सागर ठाकरे, योगेश पवार, चेतन गुल्हाणे, प्रभात पोकळे, तसेच सायबर सेल येथिल पो.नि. अंभोरे, स.पो.नि. अनिकेत कासार, स.पो.नि. प्रियांका कोटावार, पोका. अश्विन यादव यांनी केली आहे.

# नगर परिषदेच्या वतीने अजितदादांना दादांना श्रद्धांजली अर्पण

प्रतिनिधी ३० जानेवारी



**खामगाव :** नगरपरिषदेच्या वतीने लोकनेते अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

स्थानिक खामगाव नगरपरिषदेच्या सभागृहात लोकनेते अजित दादा पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी विशेष शोकसभा नगराध्यक्षा सौ अपर्णाताई फुंडकर यांनी बोलावली होती. नगराध्यक्ष सौ अपर्णा ताई फुंडकर यांनी सर्वप्रथम स्व अजित दादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहली. त्यानंतर गटनेते विजय उगले, नगरपरिषद उपाध्यक्षा सौ संतोष पुरोहित, मुख्याधिकारी प्रशांत शेळके, बांधकाम सभापती सतीश आप्पा दुडे, पाणीपुरवठा सभापती प्रशांत नायसे, महिला बालकल्याण सभापती सौ ज्योतीताई भुसारी, उपसभापती फातिमावी मो नईम, आरोग्य सभापती प्रवीण कदम, शिक्षण सभापती सौ स्नेहल गरड, नगरसेवक महेंद्र रोहणकर, सौ अनिता डवरे, प्रमोद अग्रवाल, मुन्ना पुरवार, राजेश बोबडे, प्रसाद डोरले, लक्ष्मण वनारे, लक्ष्मण आयलानी, सौ अलका रंगदाळे, विजय शर्मा, मंगेश इंगळे, सौ अश्विनी वकटे, सौ गायत्री थानवी, सौ शारदा पारखे, राकेश राणा, कृष्णा ठाकूर, अशोक हट्टेल, सौ कांताबाई पवार, विजय पद्मगिरीवार, सौ रेखा जाधव, राम मिश्रा, अँड बाबू भट्टड, नूर सभा अंजुम रशीद, खान नसीबानो शोहरत खान आदी नगरसेवक नगरपरिषद चे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वर्गीय अजितदादा पवार यांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले तत्पूर्वी सभागृहात स्तब्ध उभे राहून मौन व्यक्त करीत श्रद्धांजली वाहिली.

**जाहीर नोटिस**

सर्व लोकांना जाहीर नोटीस द्वारे सुचित करण्यात येते की,

**लिहुन घेणार: -**

१. **श्री पवन रुपराव पवार,** वय ५२ वर्षे, धंदा :व्यापार व शेती
२. **सौ. सिमा पवन पवार,** वय ४६ वर्षे, धंदा: गृहीणी
दोघेही रा. आकोट ता.आकोट जि.आकोला

**विक्रीचा करार**

**वर्णन :** मौजे केमलापुर (आकोट), प्र.ता.दु.नि.का. आकोट पं.स. आकोट ता. आकोट जि. आकोला येथील शे.स.नं. २८/१,२८/२ मधील मा. उपविभागीय अधिकारी आकोट यांचे फाईलावरील रा.मा.क्र. एन.ए.पी-३६/केमलापुर/९/२०००-२००१ चे अन्वये निवासी वापराकरीता अकृषक करण्यात आले व नकाशा मंजुर करण्यात आला त्या मंजुर केलेल्या नकाशाप्रमाणे माझ्या मालकीचा व ताब्यातील लेआऊट प्लॉट नं. ८ चे क्षेत्रफळ ४१४.५९ चौ.मी., (४४६१ चौ. फुट) जागा व या जागेवर मा. मुख्याधिकारी साहेब न.पा. आकोट यांचे फायलावरील बांधकाम परवानगी क्र. जावक के. ७८९/काविक्र. नरबांधप-१५/प्रकरण क्र. ४०१/२०१२-२०१३ दिनांक १६/९/२०१५ अन्वये बांधकाम परवानगी मिळाली असुन जो नकाशा मंजुर करण्यात आला त्या मंजुर नकाशा प्रमाणे पक्के आर.सी.सी.चे वर स्लॅब असलेले बांधकाम क्षेत्रफळ १८३.०९ चौ.मी., (१९७०.०४ चौ. फुट) च्या संपूर्ण बांधकामासह. अशी जागा बांधकामासह तदंगभूत वस्तुसह व वहीवाटीचे सर्व हक्कासह, व यात असलेल्या बोअरवेल, नळाचे कनेक्शन व इलेक्ट्रीक मिटर कनेक्शनवरील संपुर्ण मालकी हक्कासह. ज्याची. **चतुः सिमाः** पुर्वेस रस्ता, पश्चिमेस :- प्लॉट नं. ६, उत्तरेस :- श्री भोंगे याची जागा दक्षिणेस रस्ता याबाबत विक्रीचा करार करण्यात आला असून याबाबत कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर त्याची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आता पाठवावी त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. सदर नोटीस ही दिनांक ३०.०१.२०२६ रोजी प्रकाशित करण्यात आली आहे.

**जाहीरनामा**

**अर्जदार: - विष्णु शंकर थोरात,** रा. व्याड ता. रिसोड जि. वाशिम

**विरूद्ध**

**गैरअर्जदार : ग्राम पंचायत कार्यालय,** व्याड ता. रिसोड जि. वाशिम

याव्दारे सार्वत्रिक लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार विष्णु शंकर थोरात रा. व्याड ता. रिसोड जि.वाशिम यांनी त्यांचा मुलगा साईराम विष्णु थोरात रा. व्याड ता. रिसोड जि. वाशिम यांचा दिनांक २१.१२.२००६ जन्म नोंद करण्याबाबतचा विनंती अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला आहे. त्यांनी अर्जासोबत अंगणवाडी सेविका व तत्सम अन्य कर्मचारी यांचे जवाब / प्रतिज्ञापत्र, जन्म मृत्यू नोंदणी यांचा अभिप्राय, जन्म मृत्यू नोंद अनुउपलब्धता प्रमाणपत्र, स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा, साईराम यांचे आधार कार्ड, शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, कर वसुती पावती, नमुना ८ अ, आईचे मतदान कार्ड / आधार कार्ड, अर्जदार यांचे आधार कार्ड, राशन कार्ड, इत्यादी इत्यादी दस्ताऐवज सोबत जोडलेले आहेत. करिता जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) नुसार त्यांचे मुलाची जन्मांची नोंद गैरअर्जदार ग्राम पंचायत अधिकारी व्याड ता. रिसोड जि. वाशिम यांचे जन्म मृत्यू नोंदणी रजिस्टरमध्ये नोंद घेण्याकरिता आदेशित करणेबाबत अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे

करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म व्याड ता. रिसोड जि. वाशिम येथे झालेला आहे. परंतु सदरचा दस्त /अभिलेख उपलब्ध नसल्याने जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय, व्याड ता. रिसोड जि.वाशिम यांचे अभिलेखावर घेवून जन्माचे प्रमाणपत्र मिळणेकामी कोणाचेही हितसंबंध असल्यास, कोणाचेही आक्षेप हरकती / तक्रारी घ्यावयाचे असेत तर हा जाहिरनामा वृत्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसाचे आत किंवा नेमलेल्या तारखेच्या दिवशी न्यायालयात हजर होवुन आपली हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येत की, जर उपरोक्त मुदतीचे आत कोणीही योग्य हरकत न दाखविल्यास सदरहु न्यायालय उपरोक्त अर्जदारास त्यांच्या स्वतःचे जन्म नोंदणी करण्याबाबत पुरावा घेवून अर्ज निकाली काढण्यात येईल मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २१/०१/२०२६ रोजी माझ्या सहिने व शिक्यानिशी दिले.

शिक्का

**(प्रतिक्षा तेजनकर)**
**तहसिलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी रिसोड**

# जुन्या वादातून शेगावात हाणामारी, परस्परविरोधी तक्रार

प्रतिनिधी ३० जानेवारी

**खामगाव :** शेगांव येथे पेठ मोहल्ला परिसरात घडली. घटनेनंतर परस्पर विरोधी तक्रारीवरून २८ जानेवारी रोजी शेगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेख नाजीम शेख फैजुलहक (वय २७, रा. पेठ मोहल्ला, शेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आरोपी शेख इरफान (रा. अकोला), सैय्यद समीर सैय्यद नजीर व सैय्यद नजीर सैय्यद युसुफ (दोघे रा. पेठ मोहल्ला, शेगाव) यांनी संगनमत करून जुन्या वादातून लोखंडी फायटरने हनुवटीवर मारहाण करून जखमी केले. लोखंडी पाइपने हातावर मारहाण करण्यात आली असून, शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमक्याही दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी २८ जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.सैय्यद नजीर सैय्यद युसुफ (५९)

ऑटोचालक, रा. पेठ मोहल्ला, शेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, आरोपी शेख अरबाज शेख फैजुलहक, शेख जुबेर शेख फैजुलहक (दोघे रा. पेठ मोहल्ला) व सैय्यद इरफान सैय्यद अफसर (३०, रा. टिपू सुलतान चौक, शेगाव) यांनी त्यांच्या घरासमोर येऊन लोखंडी पाइपने त्यांच्या भाच्याच्या डोक्यावर, तसेच त्यांना व मुलाला मारहाण केली. शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमक्याही दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.दोन्ही प्रकरणात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ११८ (१), ११५(२), ३५२, ३५१ (२), ३५१(३), ३(५) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून, पुढील तपास पोलिस नाईक नीलेश गाडगे करीत आहेत.

सिटी न्यूज अकोला
शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## सामाजिक समरसता सप्ताहानिमित्त सामूहिक हळदी-कुंकू कार्यक्रम

**अकोट :** विश्व हिंदू परिषद तर्फे साजरा होत असलेल्या सामाजिक समरसता सप्ताहानिमित्त शहरात सामूहिक हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विश्व हिंदू परिषद प्रणित मातृशक्ती व दुर्गा वाहिनी यांच्या वतीने हा कार्यक्रम स्थानिक श्री गजानन महाराज मंदिर, अंजनगाव रोड, अकोट येथे पार पडला. या कार्यक्रमास शहरातील विविध भागातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमादरम्यान महिलांसाठी विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच महिलांच्या आत्मरक्षणासाठी उपयुक्त ठरणाऱ्या लाठी-काठी चालविण्याचे प्रात्यक्षिक दुर्गा वाहिनीच्या कार्यकर्त्यांनी सादर केले. कार्यक्रमास उपस्थित महिलांना वाण म्हणून धार्मिक पुस्तके देण्यात आली. यावेळी मातृशक्ती व दुर्गा वाहिनीच्या मीनाताई तळोकार, सीमाताई दातीर, श्वेताताई अयाचित, स्वातीताई हाडोळे, शिल्पाताई जोशी, रूपालीताई पाटील, भाग्यश्रीताई वने, शोभाताई दुबे तसेच गायत्री भोंडे आदी मान्यवर उपस्थित होत्या.

# तेल्हारा तहानलेला, बाळापूरसाठी घाई !

विशाल नांदोकार ३० जानेवारी

### ♦ वान धरणाच्या पाण्यावर डल्ला



**तेल्हारा:** तालुक्यातील शेतकरी पिकांना जागविण्यासाठी आणि अनेक गावे भीषण पाणीटंचाईने होरपळत असताना वान धरणाच्या पाण्यावरून सुरू असलेले काम अन्याय, दुजाभाव आणि नियमभंगाचे प्रतीक ठरत आहे. सध्या बाळापूरला प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू नसला, तरी बाळापूर पाणी योजनेसाठी जलशुद्धीकरण केंद्र व पाइपलाइनचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, तेल्हारा तालुक्यातील उर्वरित तसेच मंजूर गावांना पाणीपुरवठा होण्याचे साधे संकेतसुद्धा प्रशासनाकडून दिसत नाहीत, ही बाब शेतकऱ्यांच्या व नागरिकांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे.

तालुक्यात अनेक गावांत पाण्याच्या टाक्यांची कामे अर्धवट अवस्थेत आहेत. गावांतर्गत पाइपलाइन टाकण्यात आली असली, तरी वान धरणाचे पाणी गावांपर्यंत पोहोचवण्यासाठी आवश्यक यंत्रणा उभी करण्याची इच्छाशक्तीच प्रशासनाकडे दिसत नाही, असा थेट आरोप नागरिकांकडून केला जात आहे. परिणामी, धरणात पाणी असूनही तेल्हारा तालुका तहानलेलाच आहे. या प्रकरणाला गंभीर पार्श्वभूमी आहे. याच भागात वारी भैरवगड येथे पूर्वी नियमबाह्य जलशुद्धीकरण प्रकल्प सुरू करण्यात आला होता. ग्रामपंचायतीची परवानगी व आवश्यक अधिकृत मंजुरी नसतानाही काम सुरू ठेवण्यात आले होते. विशेष म्हणजे, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने ४ मार्च २०२३ रोजी या कामाला स्पष्ट स्थगिती दिली असतानाही आदेश डावलण्यात आल्याचा आरोप शेतकरी व नागरिकांनी केला होता. त्यामुळे सध्याचे कामही नियमबाह्य तर नाही ना, असा संशय अधिक गडद होत आहे.

या संपूर्ण प्रकरणात लोकप्रतिनिधी व संबंधित अधिकाऱ्यांनी अद्याप आपली अधिकृत भूमिका स्पष्ट केलेली नाही. शेतकरी व नागरिकांनी दिलेले निवेदन मा. तहसीलदारांनी स्वीकारले असले, तरी त्यानंतर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. 'निवेदन स्वीकारून प्रश्न दाबण्याचा प्रकार सुरू आहे,' अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत. या दुर्लक्षामुळे आता शेतकरी धरणे आंदोलन करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे. 'पाणी हा आमचा मूलभूत हक्क आहे. तो डावलला जात असेल, तर संघर्ष अपरिहार्य आहे,' अशी ठाम भूमिका शेतकरी घेत आहेत. तालुक्याच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झालेला असताना सजग नागरिक, शेतकरी आणि पत्रकारांनी एकत्र येऊन या अन्यायाविरोधात आवाज उठवणे अत्यावश्यक झाले आहे. आज आवाज दाबला गेला, तर उद्या तेल्हारा कायमचा पाण्यापासून वंचित राहील, असा इशाराही नागरिकांकडून दिला जात आहे. आता प्रश्न स्पष्ट आहे प्रशासन तेल्हारा तालुक्याला पाणी देणार का, की आंदोलनाला सामोरे जाणार?

**शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या**

⇨ बाळापूर ६९ खेडी पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सुरू असलेले सर्व प्रकारचे अवैध बांधकाम तत्काळ बंद (बांबविणे) करण्याचे आदेश द्यावेत.

⇨ शासन निर्णय व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या पत्राचे उल्लंघन करून काम सुरू ठेवणाऱ्या संबंधित अधिकारी, ठेकेदार व यंत्रणांवर तात्काळ कायदेशीर कार्यवाही करावी.

⇨ या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून अर्जदार व शेतकऱ्यांना लेखी खुलासा देण्यात यावा.

⇨ तेल्हारा तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी मुबलक व न्याय्य पाणीपुरवठा तातडीने करण्यात यावा.

## विश्व मांगल्य सभेचा वर्धापन दिन सोहळा संपन्न



**अकोला:** प्रत्येक घरात संस्कारक्षम, नैतिक व कर्तव्यदक्ष मातृशक्ती घडावी, या उद्देशाने कार्यरत असलेल्या विश्व मांगल्य सभेचा १६ वा वर्धापन दिन व हळदी-कुंकू समारंभ अत्यंत उत्साहात पार पडला.संस्कार, सामर्थ्य, सेवा व सदाचार या चार स्तंभांवर आधारित विश्वव्यापी मातृशक्ती संघटना म्हणून विश्व मांगल्य सभा मातृत्व सशक्ती करणाची अलख जागवत आहे. या राष्ट्रव्यापी कार्याचे केंद्रबिंदू 'माता' असून मातेमधील आत्मविश्वास,नैतिक मूल्यबोध व सेवाभाव वर्तमानाशी समन्वय साधत प्रज्वलित करण्याचा सभेचा संकल्प आहे.महर्षी दयानंद सभागृहात राष्ट्रीय अध्यक्षा रेखा खंडेलवाल यांच्या अध्यक्षतेत आयोजित या सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून नगरसेविका उषाताई विरक, केंद्रीय सदाचार सभा प्रमुख सोनियाताई तर्हाळकर, विदर्भ प्रांत अध्यक्षा मधुराताई लेंधे, प्रांत सचिव निशाताई टावरी आदी उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित नगरसेविका मंजुषाताई शेळके, मनीषाताई भंसाली, शशिकलाताई काळे, सुनिताताई अग्रवाल, वैशालीताई शेळके, कल्पनाताई गोटेफोडे निकिताताई देशमुख यांचा शाल, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

## बौद्ध समाजातील संस्थांना पायाभूत सुविधांसाठी अनुदान

**अकोला:** धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणीकृत व ५१ टक्क्यांपेक्षा जास्त बौध्द समाजातील विश्वस्त, सदस्य असलेल्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. त्यासाठी २० फेब्रुवारीपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बौध्द समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणा-या संस्थांना पायाभुत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत असून, विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.ष्इच्छुक संस्थांनी शासन निर्णय दिनांक ७ ऑक्टोबर २०२४ अन्वये नमुद केलेल्या विहीत नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रे जोडुन जिल्हा नियोजन समिती, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अकोला यांना दि. २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत २ प्रतीत कार्यालयीन वेळेत सादर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे. कागदपत्राची यादी www.maharashtra.goved.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## नगरपरिषद मध्ये अजितदादांना श्रद्धांजली



प्रतिनिधी ३० जानेवारी

**हिवरखेड:** येथील स्थानिक नगरपरिषद मध्ये दिनांक २९ च्या दुपारी अजितदादा पवार व त्यांच्या सोबत विमान अपघातात बारामती मध्ये निधन झालेल्या कर्मचाऱ्यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली वाहण्यात आली. दादांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण केले.

यावेळी नगराध्यक्ष सुलभा दुतोंडे यांच्यासह नगरपरिषद, कर्मचारी, सभापती, उपसभापती, नगरसेवक, नगरसेविका, नागरिकांनी दोन मिनिटं मौन धारण करून श्रद्धांजली अर्पण केली, तर अनेकांनी अजितदादांच्या अविस्मरणीय अनेक मुद्द्यांची आठवण करून दिली, भाजपचे रमेश दुतोंडे, संदीप इंगळे, किरण सेदानी, सौ प्रमिला रवी मानकर यांनी आपले अजितदादा बाबत विचार व्यक्त केले, तर शिवसेनेचे श्यामशिल भोपळे, राष्ट्रवादीचे, शाहरुखलाला, काँगेस कडून प्रकाश राऊत, यांनी अजितदादांचा अविस्मरणीय आठवणींना उजाळा दिला.

## प्रजासत्ताक दिनी गणपती सजावटमध्ये मांडेकर परिवाराला द्वितीय पुरस्कार प्राप्त



प्रतिनिधी ३० जानेवारी

**अकोला:** गणपती उत्सव २०२५ मध्ये पर्यवरणाची निगा राखण्या करीता वसुंधरा उपक्रमा अंतर्गत पर्यावरण पुरक गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत जयहिंद चौकातील मांडेकर परिवार यांच्या स्वंयभू गणेशाची मुर्ती पर्यावरण पुरक मातीची - व गणेशाच्या सजावट मधून वसुंधराची निगा राखून - जल महत्व - वृक्षरोपण - संवर्धन यामधुन सामाजिक संदेश यांचे संबोधन व्यक्त करीत गणेशाच्या आकर्षक सजावटीची महानगर पालिका प्रशासनाने दखल घेतली . या धार्मिक समाज संबोधन गणेशाला द्वितीय क्रंमाकाचे पारितोषिक सह ७००० / रुपयाचा धनादेश देवून गणपतीला पुरस्कार मा . आयुक्त सुनिल लहाने, उपआयुक्त विजय पारतवार ,प्रकल्प प्रमुख अनिल बिडवे यांच्या हस्ते महानगर पालिकाच्या प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य कार्यक्रमात मांडेकर परिवाराला शासकीय स्वरुपात सन्मानित करीत पुरस्कार बहाल करण्यात आला .

## सावरा ग्रामपंचायत येथे गणराज्य दिन उत्साहात साजरा





वि. प्रतिनिधी ३० जानेवारी

**अकोट :** सावरा येथे विविध संस्थांच्या वतीने प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. महात्मा गांधी चौक येथे उपसरपंच धीरज गीते यांनी ध्वजारोहण केले. तसेच सुभाष चंद्र बोस चौक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे अग्नीवीर सचिन धांडे यांच्या हस्ते पूजन व हारार्पण करून सलामी देण्यात आली. संत गाडगेबाबा स्मारक येथे मान्यवरांनी पूजन व हारार्पण केले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ स्मारकाचे पूजन केले. महारुद्र हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी लेझीम प्रात्यक्षिक केले. ग्रामपंचायत भवन येथे सरपंच स्वातीताई वैभव गुजरकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अग्निवीर सचिन धांडे व गजानन डोसे आपत्कालीन पथक तर्फे विशाल धांडे यांचा ग्रामपंचायत च्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळेस उपसरपंच धीरज गीते ग्रामपंचायत सदस्य कैलास टोलमारे ,सरला सपकाळ ,सीमा धांडे, डीगंबर सपकाळ ,संजय सोनोणे,तसेच ग्रामपंचायत अधिकारी व्ही व्ही भदे, कुलदीप मानकरकर्मचारी ,महारुद्र हायस्कूल ,प्राथमिक उर्दू शाळा, संत गाडगेबाबा मूकबधिर विद्यालय, जि प शाळा, विद्यार्थी व कर्मचारी, महसूल अधिकारी बेलसरे पो.पा. शिल्पा सपकाळ ,तं.मु. अध्यक्ष शुभम राऊत,अंगणवाडी सेविका ,आशा वर्कर उमेद अभियानाच्या कॅडर्स व गावातील बहुसंख्य तरुण तरुणी जेष्ठ नागरिकांची उपस्थिती होती.

## खेंडकर विद्यालयात दोन दिवसीय क्रीडा महोत्सव

वि. प्रतिनिधी३० जानेवारी



**अकोला:** वाशिम बायपास येथील खेंडकर विद्यालयामध्ये शालेय क्रीडा महोत्सवाचे दोन दिवसीय आयोजन करण्यात आले. शालेय क्रीडा महोत्सवानिमित्त स्वर्गीय नारायण खेंडकर कॉन्व्हेंट, स्व. यमुनाबाई खेंडकर मराठी प्राथमिक शाळा तसेच विष्णुपंत खेंडकर माध्यमिक विद्यालयामधील विद्यार्थ्यांसाठी विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

या शालेय क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश खेंडकर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अल्केश खंडकर यांच्या हस्ते करण्यात आले. १ फेब्रुवारी आणि २ फेब्रुवारी दरम्यान दोन दिवस चाललेल्या या शालेय क्रीडा महोत्सवात १०० मीटर धावणे, लिंबू चमचा, संगीत खुर्ची, फ्रॉग रेस, टिकली लावणे, हत्तीला शेपूट काढणे, मटका फोड, स्मरणशक्ती व बुक बॅलेन्स, मिऱ्या पाडणे, बटाटा शर्यत, गोळा फेक, वन मिनिट शो इत्यादी मैदानी खेळाद्वारे विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. शाळेतील मोठ्या संख्येने विद्यार्थी या स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभागी झालेत. या वार्षिक शालेय क्रीडा महोत्सवाचे सूत्रसंचालन उषा जगदाळे तर आभार प्रदर्शन सुरेश सुरत्ने यांनी केले.

## अकोली जहागीर ग्रामसभेत ग्रामसेवकाला मारण्याची धमकी, तिघांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी ३० जानेवारी

**मूर्तिजापूर:** प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित ग्रामसभेत शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करून ग्रामसेवकाला मारण्याची धमकी दिल्याची घटना अकोली जहागीर येथे घडली आहे. याप्रकरणी माना पोलिसांनी तिघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २६ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात ग्रामसभा सुरू होती. ग्रामसेवक लक्ष्मण बारकाजी चुडे ५४, रा. कुरूम हे ग्रामपंचायत कर्मचारी आणि सदस्यांच्या उपस्थितीत सभेचे कामकाज पाहत होते. यावेळी आरोपींनी संगनमत करून फिर्यादी चुडे यांच्या हातातील सभेचे कामकाज रजिस्टर जबरदस्तीने हिसकावून घेतले. तसेच त्यांना अवाच्य भाषेत बोलून मारण्याची धमकी दिली.

**यांच्यावर झाला गुन्हा दाखल**

फिर्यादी ग्रामसेवक लक्ष्मण चुडे यांच्या तक्रारीवरून माना पोलिसांनी राजकुमार भगत, धर्मराजसिंग ठाकूर, संदीप डोंगरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

ठाणेदार गणेश नावकार यांच्या मार्गदर्शनाखाली बी एन एस कलम १३२, ३५१(२) आणि ३(५) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार संदीप सरोदे करत आहेत.

## पंचकर्मावर सेमिनारचे आयोजन

प्रतिनिधी ३० जानेवारी

**अकोला:** निमा वुमन्स फोरम, अकोला द्वारा रा. तो आयुर्वेदिक महाविद्यालयच्या सभागृहात १ फेब्रुवारी रोजी 'पंचकर्म इन जनरल प्रॅक्टीस' या विषयावर सेमिनारचे आयोजन करव्यात येणार आहे. या सेमिनार मधे वैद्य साधना कुलकर्णी एम. डी. कायचिकित्सा रिकॉलिंग आयुर्वेद या विषयावर संवाद साधणार आहेत. तसेच वैद्य मीरा औरंगाबादकर एमडी कायचिकित्सा नागपुर ह्या बस्ती जिरवी वाताची मस्ती आणि त्वचा व रवतमोक्षण या दोन विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. आणि वैद्य अमृता मिश्रा एमडी स्त्रीरोग व प्रसूतीतंत्र, मुंबई या 'Evince baesd approched to Infertilityed managment byed Ayurva या विषयावर मार्गदर्शन करतील. निमा वुमन्स फोरमच्या अध्यक्षा डॉ.अलका कंठे, सचिव डॉ. मनीषा नानोरी, कोषाध्यक्ष डॉ. प्रिया मायी यांनी सर्व आयुर्वेदिक पदवीधारकांनी या सेमिनारचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे. या सेमिनारच्या आयोजना साठी बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत डॉ. ज्योती कोकाटे, डॉ. अंजली राजे, डॉ. मेधा माळपांडे, मनीषा देवकाते, डॉ. माया ठाकरे, डॉ. माया कराळे, डॉ. मधुमती नावकार, 'डॉ. सीमा वाकचवर, डॉ. मधु अग्रवाल आदीसह कार्यकारीणी मंडळाचे पंचवीस आयुर्वेदीक पदवीधर उपस्थित होते.


## स्वत :च्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला जन्मठेपेची शिक्षा, अकोट सत्र न्यायालयाचा निर्णय

प्रतिनिधी ३० जानेवारी

**अकोट :** स्वतः च्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधम बापाला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. २९ जानेवारी रोजी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी.एम. पाटील यांनी निकाल दिला.

हिवरखेड पोलिस स्टेशन अंतर्गत पोक्सो ॲक्ट मधील आरोपी महेंद्र श्रीराम कठेरिया रा. लुम्बीनी रेल्वे गेट डाबकी रोड याचे विरुध्द गुन्हा सिध्द झाला. त्याने बारा वर्षीय स्वतःच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याच्या आरोपाबद्दल आजन्म जन्मठेपेची शिक्षा व रु. २५,०००/- द्रव्यदंड व दंड न भरल्यास सहा महिने अधिकचा सश्रम कारावास अशा प्रकारे शिक्षा सुनावण्यात आली. तसेच दंडाची रक्कम आरोपीने भरल्यास २५ हजार पिडीतेला देण्यात यावे असे आदेशात नमुद केले. आरोपीला आजन्म कारावासाची शिक्षा ठोठाविण्यात आल्यामुळे ही शिक्षा तो जिवंत असेपर्यंत भोगावी लागेल. या प्रकरणात सरकारी वकील अजित देशमुख यांनी न्यायालयात युक्तीवाद केला की, २०.११. २०१७ रोजी हिवरखेड येथे गेलेले फिर्यादीचे वडील, पती महेंद्र कठेरीया व मुलगी/पिडीता हे रात्री हिवरखेडला मुक्कामी असताना आरोपी महेंद्र कठेरिया याने कुकर्म केले. या प्रकरणात आरोपीविरुध्द कलम ३७६ (२) (आय) (एफ) (एन) भादंवि., ५०६ सहकलम ५ (एल) (एन), ६ पोक्सो ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल झाला. तपास अधिकारी पोलिस उपनिरीक्षक एस.एम. भस्मे यांनी आरोपी विरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सरकारी वकील अजित देशमुख यांनी १३ साक्षीदारांच्या साक्षी न्यायालयात नोंदविल्या. त्यामधे प्रामुख्याने पिडीतेची आई, पीडिता, वैद्यकीय अधिकारी, गुख्याध्यापक व तपास अधिकारी यांच्या साक्षी महत्वाच्या ठरल्या. अजित देशमुख यांनी न्यायालयात युक्तीवाद केला की, आरोपीने केलेला गुन्हा हा अतिशय गंभीर स्वरूपाचा असून किळस आणणारा आहे. आरोपीने वडील व मुलगी या नात्याला काळीमा फासला आहे. अशा आरोपीला दया दाखविल्यास समाजामध्ये चुकीचा संदेश जाऊ शकतो. विकृत मनोवृत्तीच्या आरोपीला कुठल्याही प्रकारची दयामया न दाखविता कठोर शिक्षा देण्यात गावी. या प्रकरणात हिवरखेड पोलीस स्टेशनचे पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस हवालदार ज्योती तेलगोटे व ए.पी.पी. पी.बी. सहारे यांनी सहकार्य केले. दोन्ही पक्षाच्या अंतीम युक्तीवादानंतर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी आरोपीला शिक्षा सुनावली.

## फळांचा राजा आंबा वृक्ष मोहरला



प्रतिनिधी ३० जानेवारी

**आलेगाव:** प्रतिनिधी मोविजोद्दीन अजिजोद्दीन यांच्या आलेगाव शेतशिवारातील आंब्याचा वृक्ष मोहराने बहरला. असून सदर वृक्ष प्रत्येकाच्या मनाला आकर्षित करीत आहे. फळांचा राजा आंब्याला म्हटल्या जाणाऱ्या वृक्षाला फुलोर बहरन्यासाठी उष्ण वातावरणाची आवश्यकता असते.त्या प्रमाणे गेल्या आठवड्या पासून आलेगाव परिसरामध्ये चांगलाच बदल झाला असून दमट उष्ण वातावरण निर्माण झाल्याने आंब्याच्या झाडांना फुलोर बहरन्यासाठी पोषक बनल्यामुळे,आलेगाव शिवारात शेत असलेल्या मोविदोद्दीन अजिजोद्दीन यांच्या शेतातील आंब्याचा वृक्ष फुलोराने मोहरला असून रस्त्यावरून जा ये करणाऱ्यांच्या मनाला आकर्षित करीत आहे.त्यामुळे येथील रस्त्याने जात असताना वृक्षाच्या मोहराने मनाला आकर्षित केले.आणि कॅमेऱ्यामध्ये कैद करावे वाटले. दमट उष्ण वातावरण आंबा बहरन्यायासाठी योग्य असल्याने हे वर्ष आंबे वृद्धीसाठी चांगले असल्याचे संकेत दिसत आहेत.

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


# गांजा विक्रीप्रकरणी दोघांविरुद्ध NDPS अंतर्गत गुन्हा

प्रतिनिधी ३० जानेवारी

**पुसद** : यवतमाळ जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात पोलिसांनी कारवाई केली. पुसद शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गांजा विक्रीप्रकरणी दोघांविरुद्ध NDPS कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत १ किलो ६६५ ग्रॅम गांजासह एकूण ७८,३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



गुप्त माहितीच्या आधारे २८ जानेवारी रोजी सायंकाळी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पुसद–शेंबाळपिंपरी मार्गावर पेट्रोलिंग करत असताना मौजे बोरी मुखरे परिसरात सापळा रचण्यात आला. यावेळी बजाज प्लॅटीना मोटारसायकलवरून येणाऱ्या संशयितास थांबवून झडती घेतली असता, त्याच्याकडील प्लास्टिक पिशवीत गांजा आढळून आला.

संशयिताने आपले नाव सुनिल प्रेमचंद जोशी (वय ४८, रा. शेंबाळपिंपरी, ता. पुसद) असल्याचे सांगितले. त्याच्याकडून गांजा, मोबाईल फोन व मोटारसायकल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोघांविरुद्ध अंमली औषधी व मनप्रभावी पदार्थ अधिनियम १९८५ अंतर्गत कलम 8(c) व 20(b)(B) नुसार पुसद शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी. जे. यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.

# ट्रकची दुचाकीला धडक; आरोग्य सेवक ठार

प्रतिनिधी ३० जानेवारी

**महागाव** : महागाव तालुक्यातील हिवरा (संगम) परिसरात गुरुवारी (२९ जानेवारी) सायंकाळी साडेचारच्या सुमारास भीषण रस्ते अपघात झाला. नांदेडहून नागपूरकडे भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने (क्रमांक MH 09 EL 4392) समोरून येणाऱ्या पल्सर दुचाकीला (क्रमांक MH 38 AH 3748) जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार आरोग्य सेवकाचा जागीच मृत्यू झाला, तर ट्रकमधील दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत.

करनकुमार पुंजाजी भागवत (वय २५), रा. बेलथर, ता. कळमनुरी, जि. हिंगोली असे मृतकाचे नाव आहे.

हिंगणघाट येथील जिल्हा परिषद आरोग्य सेवक म्हणून नुकतीच नियुक्ती झाली होती. तो हिंगणघाटवरून आपल्या गावी बेलथरकडे दुचाकीने निघाला होता. अपघात इतका भीषण होता की दुचाकीचा चेंदामेंदा झाला.



## ट्रकमधील दोघे गंभीर जखमी

धडकेनंतर ट्रकचा ताबा सुटून तो रस्त्यालगतच्या नालीत कोसळला. यात ट्रकमधील दोघे जण गंभीर जखमी झाले. अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती. याचवेळी उमरखेडहून यवतमाळकडे जात असलेले अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांचा ताफा घटनास्थळी पोहोचला. त्यांनी तात्काळ जखमींना ट्रकबाहेर काढून माहूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड आणि ठाणेदार धनराज निळे यांनी स्वतः रस्त्यावर उतरून वाहतूक सुरळीत केली. नागपूर-बोरी-तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे काम पूर्ण झाले तरी हिवरा (संगम) येथील बायपासचे काम अनेक वर्षांपासून रखडले आहे. बायपास नसल्याने वाहतूक गावातील अरुंद रस्त्यांवरून होते. भरधाव वाहनांमुळे येथे अपघातांची मालिका सुरूच आहे. यापूर्वीही अनेक जीव गेले आहेत. महामार्ग प्राधिकरणाने तातडीने बायपासचे काम पूर्ण करून नागरिकांना जीवघेण्या धोक्यातून मुक्त करावे, अशी जोरदार मागणी परिसरातून होत आहे. महागाव पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सवना ग्रामीण रुग्णालयात पाठवला असून पुढील तपास सुरू आहे.

# 2 फेब्रुवारीला लोकशाहीदिन

प्रतिनिधी ३० जानेवारी

**यवतमाळ** : जिल्हा लोकशाहीदिनाचे आयोजन दि. 2 फेब्रुवारी रोजी सकाळी 10 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे करण्यात आले आहे.

दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हा लोकशाही दिनाचे आयोजन होते. उपक्रमात न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व अपिल प्रकरणे, सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे असे स्वीकारण्यात येणार नाही. तक्रार, निवेदन वैयक्तीक स्वरुपाची नसावी. महिन्यातील तिसऱ्या सोमवारी तालुका स्तरावर लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यामध्ये अर्जाचे निराकरण न झाल्यास जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज सादर करावा. तसेच अर्ज दाखल करतेवेळी तालुकास्तरीय लोकशाही दिनात अर्ज दाखल केल्याची पोच जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये सादर करावी. याशिवाय संबंधित अर्ज स्विकारले जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

# बिटरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे फोफावले

प्रतिनिधी ३० जानेवारी

**अवैध धंदे तात्काळ बंद करा; जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना निवेदन**

**उमरखेड** : बिटरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ढाणकी शहर व परिसरात सट्टा, मटका, जुगार, ऑनलाईन सट्टा तसेच अवैधरीत्या विकली जाणारी दारू यांसारख्या अवैध धंद्यांनी अक्षरशः थैमान घातले असून त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. हे सर्व अवैध धंदे तातडीने बंद करण्यात यावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या प्रणीता कांबळे यांनी यवतमाळ जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

ढाणकी शहरातील प्रमुख व वर्दळीच्या ठिकाणीच अवैध धंदे खुलेआम सुरू असून, परवानाधारक दुकानांप्रमाणे त्यांची दुकाने थाटण्यात आली आहेत. त्यामुळे स्थानिक पोलीस प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अवैध धंदे तात्काळ बंद न केल्यास उपोषणाचा मार्ग अवलंबण्याचा इशाराही देण्यात आला आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मागील काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे ढाणकी व परिसरातील बाजारपेठेवर मंदीचे सावट असताना, अवैध धंद्यांची बाजारपेठ मात्र गर्दीने फुलली आहे. तरुण पिढी या अवैध धंद्यांच्या आहारी जाऊन आर्थिक नुकसान सहन करत असून, त्याचा परिणाम गुन्हेगारी वाढीवर होत आहे. विशेषतः मागील काही काळात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचेही निदर्शनास आले आहे. ढाणकी शहर व परिसरातील खुलेआम सुरू असलेले अवैध धंदेच या सर्व समस्यांचे मूळ कारण असल्याचा आरोप करण्यात आला असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तात्काळ कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर प्रणीता कांबळे यांच्यासह अक्षय भगत व सुधाकर कांबळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या निवेदनावर पोलीस व जिल्हा प्रशासन काय कारवाई करते, याकडे आता ढाणकीसह परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# ढाणकी प्रीमियर लीगवर 'मॉर्निंग वॉरियर्स'ची मोहोर

प्रतिनिधी ३० जानेवारी

**ढाणकी** : प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ढाणकी येथील दत्त मंदिर परिसर, टेंभेश्वर नगर येथे आयोजित करण्यात आलेली ढाणकी प्रीमियर लीग–२०२६ क्रिकेट स्पर्धा चुरशीच्या सामन्यांनी व जल्लोषात पार पडली. मॉर्निंग क्रिकेट क्लब यांच्या वतीने आयोजित या स्पर्धेत 'मॉर्निंग वॉरियर्स' संघाने अष्टपैलू खेळाचे दर्शन घडवत विजेतेपद पटकावले.

तीन वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर या स्पर्धेचे पुनरागमन झाले होते. यंदा एकूण ८ बलाढ्य संघांमध्ये ही लढत रंगली. अंतिम सामन्यात मॉर्निंग वॉरियर्स आणि टीचर इलेव्हन यांच्यात अटीतटीचा सामना झाला. निर्णायक क्षणी उत्कृष्ट



फलंदाजी व अचूक गोलंदाजीच्या जोरावर मॉर्निंग वॉरियर्सने विजय मिळवला, तर मॉर्निंग फायटर्स संघाने तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेत पत्रकार इलेव्हन, नगर पंचायत इलेव्हन, बिटरगाव पोलीस स्टेशन इलेव्हन, बिझनेस असोसिएशन तसेच सेव्हियर्स (मेडिकल इलेव्हन) यांसारख्या विविध क्षेत्रांतील संघांनी सहभाग नोंदवून स्पर्धेला वेगळीच रंगत आणली. दि. २३ ते २६ जानेवारी दरम्यान पार पडलेल्या या क्रिकेट महोत्सवामुळे टेंभेश्वर नगर परिसरात क्रीडाप्रेमींचा उत्साह शिगेला पोहोचला होता. खेळाडूंची मेहनत, प्रेक्षकांचा प्रतिसाद आणि शिस्तबद्ध आयोजनामुळे स्पर्धा यशस्वी ठरल्याचे समाधान आयोजकांनी व्यक्त केले. स्पर्धेच्या समारोपप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या संघांना आकर्षक चषक व पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावेळी स्थानिक नागरिक व क्रीडाशौकीन उपस्थित होते.

# 'तो पेट्रोल पंप हटवाच'; उमरखेड नगरपरिषदेत एकमताने ठराव मंजूर

प्रतिनिधी ३० जानेवारी

**उमरखेड** : शहरातील महात्मा गांधी चौकात पेट्रोल पंप हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या सौंदर्यीकरण व सुरक्षिततेस अडसर ठरत आहे. सदर पेट्रोल पंप तातडीने हटवावा, असा ठराव उमरखेड नगरपरिषदेच्या सभागृहात गुरुवारी (दि. २९) एकमताने मंजूर करण्यात आला. या निर्णयाकडे आता शिवप्रेमींसह शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

गांधी चौक हा शहरातील अत्यंत वर्दळीचा परिसर असून याच ठिकाणी नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग, उमरखेड–बिटरगाव राज्य महामार्ग,




शॉपिंग कॉम्प्लेक्स, मार्केट लाईन, नगरपरिषद कार्यालय तसेच मंगल कार्यालय आहे. पेट्रोल पंपालगत वीज वितरण कंपनीची मोठी विद्युत डीपी असून मंगल कार्यालयात होणाऱ्या विवाह सोहळ्यांदरम्यान फटाक्यांची आतषबाजी केली जाते. या ठिकाणी नेहमीच नागरिक, महिला व लहान मुलांची मोठी गर्दी असते. त्यामुळे भविष्यात मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही, असा मुद्दा सभागृहात मांडण्यात आला.

सदर पेट्रोल पंपाची लीज ३१ जुलै २०२५ रोजी संपुष्टात आलेली असतानाही तो अद्याप सुरू आहे. विशेष म्हणजे, हा पेट्रोल पंप हटविण्याबाबत नगरपरिषदेने यापूर्वीही १४ नोव्हेंबर १९७५ रोजी ठराव क्रमांक ७ आणि १४ मार्च २००२ रोजी ठराव क्रमांक २० अन्वये सर्वानुमते निर्णय घेतला होता.

शहराची विकास योजना १९९९ पासून अंमलात असून त्यानुसार नगरपरिषद कार्यालयासमोरील सदर जागा रस्त्यासाठी आरक्षित आहे. विकास नियंत्रण नियमावलीनुसार पेट्रोल पंपासाठी आवश्यक किमान जागाही उपलब्ध नसल्याचे अभिलेखांवरून स्पष्ट होते. तरीदेखील आजतागायत पेट्रोल पंप हटविण्यात आलेला नाही. या ठरावाच्या विरोधात पेट्रोल पंपधारकांनी यवतमाळ जिल्हाधिकाऱ्यांकडे कलम ३०५ अंतर्गत दाद मागितली होती. त्या वेळी पेट्रोल पंप अन्य ठिकाणी हलविण्यासाठी एक वर्षाची मुदत देण्याची विनंती करण्यात आली होती; मात्र ती मुदतही संपली आहे.

उपरोक्त सर्व बाबी लक्षात घेता भारत पेट्रोलियम कंपनीच्या पेट्रोल पंपास कोणत्याही प्रकारची लीजवाढ देऊ नये व तातडीने तो हटवावा, असा ठराव सभागृहात मंजूर करण्यात आला. आता यावर शासन काय निर्णय घेते, याकडे शिवप्रेमी व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अजितदादांना श्रद्धांजली वाहण्यासाठी ढाणकी 'कडकडीत बंद'

प्रतिनिधी ३० जानेवारी

**ढाणकी** : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जनसामान्यांचे नेते अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी काल ढाणकी शहरात अभूतपूर्व 'कडकडीत बंद' पाळण्यात आला.

स्थानिक व्यापारी, विविध संघटना आणि नागरिकांनी पुकारलेल्या या आवाहनाला शहरात १०० टक्के प्रतिसाद मिळाला असून, संपूर्ण बाजारपेठेत शांतता पसरली होती. सकाळी नऊ वाजल्यापासूनच ढाणकीतील सर्व छोटी-मोठी दुकाने, मुख्य बाजारपेठ आणि व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद ठेवण्यात आली. केवळ अत्यावश्यक सेवा वगळता सर्व व्यवहार थांबवून नागरिकांनी आपल्या लाडक्या नेत्याप्रती आदर व्यक्त केला.

शहराच्या मुख्य चौकात अजित दादांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. अजित दादांचे कणखर नेतृत्व आणि विकासाची दृष्टी नेहमीच प्रेरणादायी राहिली आहे.




त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण झालेली पोकळी कधीही भरून काढता येणार नाही," अशा शब्दांत मान्यवरांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली या श्रद्धांजली सभेत सर्वपक्षीय नेते यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# मशिनरीच्या नावाखाली व्यापाऱ्याची फसवणूक

प्रतिनिधी ३० जानेवारी

**पांढरकवडा** : मशिनरी पुरवठ्याचे आमिष दाखवून एका व्यापाऱ्याची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार पांढरकवडा तालुक्यात उघडकीस आला आहे. नाशिक येथील एका मशिनरी विक्रेत्याने पाटणबोरी येथील व्यापाऱ्याकडून एक लाख रुपये उकळून त्यापैकी निम्मी रक्कम परत न केल्याने संबंधिताविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

पाटणबोरी येथील रहिवासी सुफियान अमिनोद्दीन राठोड यांचे एस. आर. मॅट्रेस अँड फोम हाऊस नावाचे दुकान आहे. गादी शिवण्यासाठी आवश्यक असलेली मशिन खरेदी करण्यासाठी त्यांनी नाशिक येथील ॲडव्हान्स मशिनरीचे चालक कुरेशी आरीफ शेख यांच्याकडे दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजी १ लाख ९२ हजार रुपयांच्या मशिनची ऑर्डर दिली होती. या व्यवहारानुसार सुफियान राठोड यांनी १८ व १९ ऑगस्ट २०२५ रोजी दोन टप्प्यांत एकूण १ लाख रुपये ऑनलाईन स्वरूपात पाठवले. ३० दिवसांत मशिनची डिलिव्हरी देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, पाच महिने उलटूनही मशिन मिळाली नाही. वारंवार विचारणा केल्यानंतरही संबंधित विक्रेत्याने उडवाउडवीची उत्तरे देत टाळाटाळ सुरू ठेवली. फसवणूक होत असल्याचे लक्षात येताच राठोड यांनी आपली रक्कम परत मागितली. त्यानंतर २४ ऑक्टोबर २०२५ रोजी आरोपीने ५० हजार रुपये परत केले, मात्र उर्वरित ५० हजार रुपये देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. मशिन न मिळाल्याने आणि उर्वरित रक्कमही बुडाल्याने आर्थिक व मानसिक अडचणीत सापडलेल्या सुफियान राठोड यांनी अखेर पांढरकवडा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करून अटक करण्याची मागणी त्यांनी अर्जाद्वारे केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# परसोडा ग्रामपंचायतच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

प्रतिनिधी ३० जानेवारी

**आर्णी** : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते स्व. अजितदादा पवार यांच्या खाजगी विमान दुर्घटनेत झालेल्या दुःखद निधनानंतर राज्यात तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर परसोडा (ता. आर्णी) ग्रामपंचायतीने शासकीय दुखवट्यात सहभागी होऊन स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित या श्रद्धांजली सभेत माजी सरपंच अतुल देशमुख, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर राठोड, दिग्विजय मुंडवाईक, ग्रामपंचायत



अधिकारी, तंटामुक्ती अध्यक्ष रंगराव शाहीर आडे, उपाध्यक्ष अरुण देशमुख, गोर प्रफुल्ल जाधव, शंकर कोल्हे, जितेश तुवर, आकाश राठोड, स्वप्नील सोळंके, उत्तम राठोड, गणेश जाधव, रामकृष्ण पत्रे, मंगेश सोळंके, कर्मचारी भगवान सोळंके आणि अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

अतुल देशमुख (माजी सरपंच, ग्रामपंचायत परसोडा) यांनी म्हटले, "दादा फक्त बारामतीचे विकासच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात विकास काम करणारे नेते होते. अजित दादा यांनी कधी जाती-पातीचे राजकारण केले नाही. ते नेहमी विकास कामांना प्राधान्य देणारे नेता होते. आज आपल्यातून असे नेते निघून गेले आहेत. हे पोकळी महाराष्ट्रात कधी भरून निघणार नाही. दादांना भावपूर्ण श्रद्धांजली!"

गोर प्रफुल्ल जाधव (माजी तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) यांनी सांगितले, "अजित दादा नेहमी कार्यकर्त्यांना जपून ठेवणारे नेते होते. दादांचे आम्हा कार्यकर्त्यांना सोडून जाणे हे न सहन होणारी वेदना आहे. आज महाराष्ट्राने एक कणखर नेता गमावला आहे. दादांना जड अंतःकरणाने भावपूर्ण श्रद्धांजली!" स्व. अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी मुंबईहून बारामतीकडे जात असताना खाजगी Learjet 45 विमान बारामती विमानतळाजवळ लँडिंगदरम्यान दुर्घटनाग्रस्त झाले. या अपघातात अजितदादांसह विमानातील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. संपूर्ण राज्यात शोककळा पसरली असून, राजकीय नेते आणि कार्यकर्ते त्यांच्या स्मृतीला वंदन करत आहे.

# साहित्यिक व वृद्ध कलाकारांच्या 4 ते 6 फेब्रुवारीला होणार मुलाखती

प्रतिनिधी ३० जानेवारी

**आर्णी** : महाराष्ट्र शासनाच्या राज्यश्री शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलाकार मानधन योजनेअंतर्गत पन्नास वर्षांवरील कलावंताची मुलाखत व निवड चाचणी प्रक्रिया आर्णी पंचायत समिती येथे ४ ते ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधी घेण्यात येणार आहे.

आर्णी तालुक्यातील 278 वृद्ध साहित्यिक व कलावंत यांनी सन २०२२ ते सन २०२६ या वर्षात शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक कलावंत मानधन सन्मान योजनेअंतर्गत अर्ज सादर केले होते. तालुक्यातील 278 पात्र लाभार्थ्यांची मुलाखत व निवड चाचणी निवड समितीचे सदस्य बाबालाल परसराम राठोड, हभप. डॉ. सौ ललिता राजेद्र घोडे सहा. गटविकास अधिकारी सुधाकर पंडे पं. स. आर्णी यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे तरी वृद्ध साहित्यिक व वृद्ध कलावंत यांनी मुलाखत व निवड चाचणीच्या वेळी आवश्यक त्या वेशभूषा व आपल्याला लागणारे साहित्य घेऊन वरील ठिकाणी कार्यालयीन वेळेत दिलेल्या तारखेस प. स.आर्णी येथिल सभागृत उपस्थित राहावे असे आवाहन रमेश खारोडे गट विकास अधिकारी पंचायत समिती आर्णी यांनी तालुक्यातील पात्र वृध्द कलावंतांना केले.

# हजरत उमर फारूक शाळेत सिरत-ऊन-नबी क्विज कार्यक्रम



प्रतिनिधी ३० जानेवारी

**पुसद** : हजरत उमर फारूक शाळेत सिरत-ऊन-नबी (स.अ) क्विजचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक वकील होते, तर प्रमुख वक्ते मोईनुद्दीन ईकबाल आणि प्रमुख पाहुणे नवेद अहमद, नदीम अहमद खान, निसार अहमद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फहिमुद्दीन मलनस यांनी केले. विद्यार्थ्यांना काही दिवसांपूर्वी 'दुर्रेयतीम' पुस्तक वाटप केले होते आणि पूर्ण अभ्यासानंतर त्यावर परीक्षा घेण्यात आली.

प्रश्नपत्रिकेत एकूण 100 प्रश्न होते, त्यापैकी 80 पर्यायवाचक व 20 लेखी होते. परीक्षा दोन गटांमध्ये घेण्यात आली आणि रम्य वातावरणात संपन्न झाली. प्रथम बक्षीस 1000 रुपये व सन्मान चिन्ह - फरीसा खानम नवेद खान, द्वितीय बक्षीस 700 रुपये व सन्मान चिन्ह - अम्मारा उरुज साबीर अहमद, तृतीय बक्षीस 500 रुपये व सन्मान चिन्ह - आयतुल्ला काईद शेख हुसेन व सदफ फिरदोस जमील खान, वर्गात प्रथम विद्यार्थी: आफिया खैर शेख इरफान, उम्मे ऐमन शेख फरीद, सय्यद गुफरान सय्यद तौफिकुद्दीन, सय्यद रेहान सय्यद रशीद, नौशीन खानम नसरूल्लाह खान, अफ्फान दानिश शेख चांदपाशा, मसिरा फिरदोस अब्दुल गफ्फार, मुसलेमा तहेरा सय्यद तौफिकुद्दीन यांनी यश प्राप्त केले. सर्व परीक्षेत हजर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमाचे यश मुख्याध्यापक वकील व शिक्षक टीम - करीम, नौशाद, सीमान, शेख इरफान, जुनेद, मुसैब, मुरसलीन, हुसैन, सकलैन, फैसल, रहेमत यांना श्रेय आहे.









## रेती तस्करी भारी

### प्रशासन दस नंबरी, तर रेती तस्कर शंभर नंबरी...

# वाहतुकीसाठी चक्क 'गाढवाची' स्वारी !

## ट्रॅक्टरवर कारवाई, मात्र हायवा सारखी मोठे टिप्पर बिनबोभाट सुरूच...

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात रेती घाटाचे अधिकृत लिलाव न झाल्यामुळे नजीकच्या मराठवाड्यातून अवैध रेती मोठ्या प्रमाणात येत आहे. रेती तस्करीत रिसोड तालुका अग्रस्थानी असून मराठवाड्यातील सेनगाव व मंठा, तळणी मार्गे मोठमोठ्या हायवा टिप्परमधून अवैध रेती ग्रामीण भागात रिचवल्या जात आहे. महसूल विभागाच्या अर्थपूर्ण संबंधातून रेती तस्करी होत असल्याने रेतीचे भाव गगनाला भिडले आहेत. ग्रामीण भागातून होणाऱ्या अवैध ट्रॅक्टर वाहतुकीवर महसूल प्रशासन कारवाई करत वाळू माफियांचे 'पितळ' झाकण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु चोरटी रेती बेभावात खरेदी करणे गोरगरिबांना शक्य होत नाही. परिणामी आता पैनगंगा नदी पात्रातून चक्क गाढवावरून रेती वाहतूक होत असल्याचे चित्र समोर येत आहे.

जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात रेतीघाटाचे लिलाव रखडल्याने मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात चोरटी रेती येत आहे. मात्र ग्रामीण भागातील लहान, मोठ्या नदीनाल्यातून अवैध वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टरवर सर्रास कारवाई केली जात असून बाहेरून येणारे अवैध रेती वाहतूक करणारे मोठे टिप्पर राजरोस रेती रिचवून जात आहेत. परिणामी सदर रेती तस्करी अर्थपूर्ण संबंधातून होत असल्याची चर्चा जिल्हाभर सुरू आहे.

रिसोड तालुक्यातील रेतीघाट खुले न झाल्याने गोरगरिबांना बेभावात चोरटी रेती घ्यावी लागत आहे. महसूल विभाग अर्थपूर्ण संबंधातून अवैध वाळू वाहतूकीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याने अवैध रेतीचे भाव आकाशला भिडले आहेत. महसूल विभागासाठी वाळू म्हणजे एक गौण खनिज असले तरी तस्करांसाठी वाळू सोन्याचे अंडे देणारी कोंबडी ठरत आहे. त्यामुळे गब्बर झालेले तस्कर वाट्टेल त्या मनमानी भावात रेती विकत आहेत. ही घरकुल लाभार्थ्यांसाठी हानिकारक ठरत असून अनेक गोरगरीब लाभार्थ्यांचे घरकुल बांधण्याचे स्वप्न, अखेर स्वप्नच ठरत आहे.

तालुक्यात होत असलेली अवैध रेती वाहतूक कारवाई नाममात्र असून अर्थपूर्ण संबंधातून मात्र रेती तस्करी राजरोस सुरू आहे. रात्रभर अवैधरित्या वाळूने भरलेल्या टिप्परची नियोजित स्थळी वाहतूक होत, चढ्यादराने रेतीविक्री होत असल्याचे चित्र समोर येत आहे. त्यामुळे रेतीवर बंदी असून देखील मोठ्या प्रमाणात रेती येते कुठून ? असा प्रश्न सामान्य नागरिक विचारत आहेत.

ही गंभीर बाब लक्षात घेऊन जिल्हाधिकारी यांनी तालुक्यातील रेतीघाट खुले करून द्यावेत अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा रेतीतस्कर काबूत ठेवून चोरट्या रेतीचे भाव नियंत्रित करावे अशी मागणी गोरगरीब जनता करत आहे.

## थोडक्यात

### शिक्षकेतर संघटनेचे ५३ वे राज्य अधिवेशन १ फेब्रुवारीला मुंबईत

**जिल्ह्यातील शिक्षकेतर यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांच्या महामंडळाचे ५३ वे राज्यस्तरीय अधिवेशन चेंबूर, मुंबई येथील लोकमान्य बाळ गंगाधर टिळक





मैदान या ठिकाणी दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ ला आयोजित करण्यात आले आहे. महामंडळाच्या राज्यव्यापी अधिवेशनात शिक्षकेतर बांधवांच्या प्रलंबित प्रश्नावर विचार विनिमय, चर्चासत्र व परिसंवाद होणार आहे यामध्ये अनेक शिक्षण तज्ञ विचारवंतांचे मार्गदर्शन लाभणार आहे अधिवेशनाचे प्रमुख अतिथी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे उपस्थित राहणार आहेत तसेच शिक्षक आमदार विक्रम काळे, जयंत आसगावकर पदवीधर आमदार निरंजन डावखरे, सत्यजित तांबे, ज्ञानेश्वर म्हात्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. महामंडळाचे अध्यक्ष अनिल माने व सरकार्यवाह शिवाजीराव खांडेकर यांनी सांगितले की, अधिवेशनात राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती, आश्वासित प्रगती योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे, अनुकंपा तत्त्वावरील पदांची नियुक्ती करणे, जुनी पेन्शन योजना या आणि इतर अनेक विषयावर सविस्तर चर्चा होणार आहे तरी या अधिवेशनासाठी आपल्या वाशिम जिल्ह्यातील सर्व जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकारी व इतर सर्व शिक्षकेतर बंधू भगिनींनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष कैलास ढवळे जिल्हा सचिव रामराव कायंदे कार्याध्यक्ष प्रफुल्ल काळे व सर्व जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकारी यांचे वतीने करण्यात येत आहे.

### कारंजा पाणीपुरवठा योजनेचे ग्राहकाकडे १ ९ कोटी रुपये थकबाकी...

## पाणीपट्टी न भरल्यास नळ कनेक्शन कट करण्याची धडक मोहीम !

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणीपुरवठा योजनेचे ग्राहकाकडे १९ कोटी रुपये थकबाकी असून कारंजा पाणी पुरवठा योजना आर्थिक संकटात सापडली असून थकबाकीदार ग्राहकांनी ताबडतोब पाणीपट्टीचा भरणा करावा परंतु वारंवार सुचित तसेच नोटीसेस व लाऊड स्पिकरद्वारे आव्हान करुनही ग्राहकांकडून योग्य तो प्रतिसाद मिळत नाही. या सर्व ग्राहकांना उन्हाळा, हिवाळा, पावसाळा या तिन्ही ऋतू मध्ये नियमित पाणीपुरवठा होतो परंतु शहरातील काही ग्राहक नेहमी पाणी पट्टी देयके भरत नाही. काही ग्राहकाकडे मोठ्या प्रमाणावर पाण्याची देयके बाकी आहे. त्यामुळे निखील



देशमुख उपविभागीय अभियंता यांचे मार्गदर्शनात संपूर्ण शहरामध्ये वसुलीची विशेष मोहीम राबवून चार पथके गठीत करण्यात आले असून संबंधित कर्मचारी ग्राहकांच्या घरी दारोदारी भेटी देत आहेत व थकबाकी भरण्याबाबत विनंती करण्यात येत आहे. ग्राहंकाकडून योग्य प्रतिसाद न मिळत असल्यामुळे माहे जानेवारी २०२६ पासून नळ कनेक्शन बंद करण्याची धडक मोहिम हाती घेण्यात आली आहे. त्यामुळे नागरीकांना आव्हान करण्यात येते की ज्यांच्याकडे पाणी पट्टी थकीत आहे अश्या थकबाकीदार ग्राहकांनी त्वरीत पाणीपट्टीचा भरणा करुन नळ जोडणी खंडीतची अप्रिय घटना टाळावी व सहकार्य करावे.

## विमाशी संघाचा रविवारी... विदर्भस्तरीय शिक्षक मेळावा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

संत नगरी शेगाव येथे विदर्भातील पाचही जिल्ह्यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू-भगिनीच्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या विविध समस्यांवर चर्चा करून त्यावर प्रभावी उपाययोजना करता यावी म्हणून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे विदर्भस्तरीय अधिवेशन तथा शिक्षक मेळावा रविवार दिनांक १ फेब्रुवारी रोजी करण्यात आला आहे.

या शिक्षक मेळाव्याला विधान परिषदेचे सदस्य तथा संघटनेचे सर कार्यवाह सुधाकरराव अडबाले , माजी विधानपरिषद सदस्य तथा महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे सरचिटणीस व्ही यु डायगव्हाणे, आ. अभिजीत वंजारी, रामदास मसराम अमरावती विभागाचे पदवीधर मतदार संघाचे विधान परिषद सदस्य धीरज लिंगाडे, मेस्टाचे राज्याध्यक्ष डॉक्टर संजय तायडे पाटील विमाशी संघाचे प्रांतिक अध्यक्ष अरविंद देशमुख, राज्य आयटीआय निदेशक संघटनेचे सल्लागार भोजराज काळे, महाराष्ट्र आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे राज्य सरचिटणीस किसान पुंड, आदिवासी आश्रम शाळा शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष डॉ. डी एल. कराड, महाराष्ट्र राज्य जुने पेन्शन संघटनेचे राज्याध्यक्ष वितेश खांडेकर, राज्य सरचिटणीस आशुतोष चौधरी व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनेचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू आदी मान्यवर उपस्थित राहणार अ आहेत. तरी शिक्षक व कर्मचारी बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विमाशि संघटनेचे विभागीय कार्यवाह बाळासाहेब गोटे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे सदस्य विनायक उज्जैनकर, वाशीम जिल्हाध्यक्ष रामेश्वर अवचार व जिल्हा कार्यवाह कुलदीप बदर यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## स्वयंसिद्धा भगिनींसाठी आरोग्य शिबिर व हळदीकुंकू कार्यक्रम

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

स्थानिक वत्सगुल्म कृषी विकास प्रकल्प, तोरणाळा- वाशीम येथे २२ जानेवारी रोजी १५५ महिलांची महाआरोग्य तपासणी शिबिर, हाडांची ठिसूळता तपासणी शिबिर, संपूर्ण आरोग्य रक्त तपासणी शिबिर व औषधी वाटप कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समिती अध्यक्ष श्री देविदासजी पाटील तर प्रमुख अतिथी म्हणून स्वयंसिद्धा प्रकल्प प्रमुख तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त डॉ सौ ललितताताई घोडे, परसबाग प्रकल्प प्रमुख सौ माधवीताई राजे, समिती उपाध्यक्ष मिलिंदजी भावसार, सचिव राजेश कराळे सर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री राजेश कराळे सरांनी केले. डॉ सौ ललितताताई घोडे यांनी मार्गदर्शन केले . सौ माधवीताई राजे यांनी



मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमात अयोध्या येथील प्रभू श्रीरामचंद्र मंदिर प्राणप्रतिष्ठा दिन साजरा करण्यात आला सोबतच समिती उपाध्यक्ष श्री मिलिंदजी भावसार यांचा जन्मदिन अभिष्टचिंतन सोहळा सुद्धा पार पडला. समितीचे कार्य आणि उद्देश पाहून रोटरी इनरव्हील क्लब तर्फे ५१०० रुपयाचे आर्थिक सहकार्य उपस्थित क्लब सदस्यांनी चेकद्वारे दिले. उपसमिती सदस्य श्री मयूर चुंबळकर यांचा वाशिम जेसीआय अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमाला वाशिम शहर तसेच

**वत्सगुल्म कृषी विकास प्रकल्पाद्वारे आयोजन**

ग्रामीण भागातून अनेक गणमान्य व्यक्तींनी भेट दिली. आरोग्य शिबिरासाठी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ विजय काळे यांच्या मार्गदर्शनात प्राथमिक आरोग्य केंद्र, काटा येथील डॉ देशमुख मॅडम ,डॉ कोल्हे, डॉ भाग्यवंत, आशा वर्कर्स व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समिती सदस्य डॉ दीपक ढोके, संजय डवरे सर, प्रमोद लक्रस, माधव जागीरदार, सौ प्राजक्ता देवगिरकर, समन्वयक विजय टोंचर, सुनील सावके, पुंडलिकराव ढोबळे, जयंती राठोड यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समिती सदस्य डॉ दीपक ढोके यांनी तर आभार प्रदर्शन प्रमोद लक्रस यांनी केले.

### ध्वजारोहनच करत नाहीतर, ध्वजखांब कशाला...

# राष्ट्रीय ध्वजाचा अपमान सणा- सणाला !

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

देशभरात राष्ट्रीय सण मोठ्या उत्साहात, अभिमानाने आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात साजरे होत असताना केनवड येथील (एसबीआय) उपशाखेत मात्र धक्कादायक प्रकार समोर आला आहे., २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनासारख्या राष्ट्रीय सणाच्या दिवशी बँकेच्या इमारतीवर ध्वजखांब असतानाही ध्वजारोहन करण्यात आले नाही. 'गार्ड उपलब्ध नाही' असे कारण पुढे करून ध्वजारोहन टाळण्यात आल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

राष्ट्रीय ध्वज हा केवळ औपचारिक वस्तू नसून तो देशाचा मान, अस्मिता आणि संविधानिक मूल्यांचे प्रतीक आहे. अशा वेळी राष्ट्रीय सणाच्या दिवशी ध्वजारोहन न करणे हे केवळ निष्काळजीपणाचे नव्हे, तर राष्ट्रीय ध्वजाचा अपमान असल्याची भावना




नागरिक व्यक्त करत आहेत. विशेष म्हणजे बँकेच्या इमारतीवर कायमस्वरूपी ध्वजखांब उभारलेला असताना, जर ध्वजारोहन करायचेच नसेल तर ध्वजखांब उभारण्यामागचा उद्देश काय, असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे. 'ध्वजखांब फक्त शोभेसाठी आहे का?' असा संतप्त प्रश्न नागरिक विचारत आहेत.

राष्ट्रीयकृत बँक म्हणून एसबीआयसारख्या संस्थेकडून अशा बाबतीत आदर्श व जबाबदार भूमिका अपेक्षित असते. मात्र केनवड येथील या प्रकारामुळे बँक प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत तात्काळ खुलासा करावा तसेच पुढील काळात असे प्रकार घडू नयेत यासाठी ठोस व स्पष्ट पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे


५ बुधवार दि. २८ जानेवारी २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express

२६ जानेवारीच्या तिरंगा देशभर फडकला,

शाखाधिकाऱ्याने उपशाखा, गार्डच्या दाखवला बहाणा,

केनवड एस बि आय बँकेत तिरंगा न फडकता अडकला !

एसबीआय बँकेत झाले नाही ध्वजारोहण !

*पहा मुजोर शाखाधिकारीची हिम्मत

*गार्ड नसल्याने राष्ट्रीय सणाला दिली कवडीमोल किंमत

## चाल ढकलीचा अवलंब कारवाईला विलंब !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

आठ वर्षापूर्वी राजचिन्हाचा चुकीच्या पध्दतीने वापर करून राजचिन्हाचा अवमान केल्याची तक्रार अनंत तायडे यांनी केली होती. ही तक्रार निकाली काढण्यासाठी वारंवार पुढाकार घेतला. पत्रव्यहार केला, मात्र चालढकलीचा अवलंब होत असून कारवाईला विलंब होत आहे. त्यामुळे तक्रार निकाली काढा, संबंधितांवर कारवाई करा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अनंत तायडे यांनी पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनानुसार गैरअर्जदारांनी राजचिन्हाचा वापर व नियमाचे उल्लंघन केले आहे. त्यांना राष्ट्रद्रोहाच्या गुन्ह्यात अडकवून अटक करण्याची मागणी वारंवार निवेदनातून केली आहे. मात्र, या तक्रारीवर वारंवार



चालढकल केल्या जात आहे. हे प्रकरण २०१८ पासून शासकीय दरबारी तक्रारीच्या स्वरूपात प्रलंबीत आहे. मात्र, भ्रष्टाचाराचा अवलंब करणाऱ्या भ्रष्ट अधिकारी कारवाईस विलंब करीत आहेत. कारवाईस विलंब म्हणजेच पुन्हा कायद्याचे उल्लंघन होय. त्यामुळे ८ वर्षापासून तक्रारी निकाली न काढता संबंधितांवर कारवाई न करता चालढकललीचे अवलंबन करून कारवाईला विलंब केल्या जात आहे. त्यामुळे या सर्व तक्रारीची दखल घेवून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते अनंत तायडे यांनी पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांसह संबंधितांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com







# शहर सुधार आघाडीची सत्ता

## सत्ता पक्ष

## विरोधी पक्ष













## भाजपची स्ट्रॅटेजी, महापौर शहर सुधार आघाडीचा

### ♦ महापौरपदी शारदा खेडकर, उपमहापौर अमोल गोगे

प्रतिनिधी ३० जानेवारी

**अकोला :** अकोला महापालिकेतील सत्ता राखण्यात भाजप प्रणित शहर सुधार आघाडीला यश मिळाले. भाजपची स्ट्रॅटेजी यशस्वी झाली आणि नववा महापौर आणि उपमहापौर शहर सुधार आघाडीचा झाला. आपलीच सत्ता येणार असा आत्मविश्वास असल्याने निवड प्रक्रियेपूर्वीच महापौरांच्या दालनात पंतप्रधानांसह भाजप नेत्यांच्या प्रतिमा लावण्यात आल्या होत्या.

महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला ३८ जागा मिळाल्या. बहुमतासाठी तीन जागा कमी पडल्या. परंतु राष्ट्रवादी अजित पवार पक्ष आणि सुनील मेश्राम यांच्या महानगर विकास समितीचा एक असे निवडणूक पूर्व युतीचे सदस्य सोबत होते. एक जागा कमी होती. त्यामुळे जागांचे गणित बसवून सत्ता काबीज करण्यासाठी शिंदे सेना, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांचे चार नगरसेवक सोबत आले. शहर सुधार आघाडी स्थापन झाली. आघाडीचा आकडा ४४ झाला. इतकेच नाही तर विभागीय आयुक्तांकडे आघाडीची नोंद, नगरसेवकांची ओळख परेड करून आघाडी भक्कम करण्यात आली. आमदार रणधीर सावरकर, जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, विजय अग्रवाल, राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे महानगर अध्यक्ष विजय देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे महानगर अध्यक्ष रफिक सिद्दीकी, महानगर विकास समिती प्रमुख सुनील मेश्राम यांच्या पुढाकाराने शहर सुधार आघाडी भक्कम झाली. विरोधकांचे दावे फोल ठरवण्यात आघाडी यशस्वी झाली.

काँग्रेसला २१ जागा मिळाल्यामुळे आम्ही सत्ता स्थापन करणार असा दावा आमदार साजीद खान पठाण यांनी केला होता. वंचित बहुजन आघाडी, शिवसेना उबाठा आणि मित्र पक्ष मिळून सत्ता हाती घेण्याचा प्रयत्न होता. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख बाळासाहेब आंबेडकर यांच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आला. यशवंत निवासस्थान विरोधी हालचालींचे केंद्र बनले होते. अर्थात सत्तेसाठी प्रयत्न करण्यात गैर नाही. मात्र, सत्ता हाती घेणे, बहुमत प्राप्त करणे तितके सोपे नाही. याची प्रचिती एव्हाना विरोधकांना आली असेल.

## महापालिकेत भाजप मित्र पक्षांनी मिळविले यश

प्रतिनिधी ३० जानेवारी

**अकोला :** महापालिकेतील सत्ता स्थापनेसाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे भाजपा प्रणित शहर सुधार आघाडीने दणदणीत विजय मिळवून महापालिकेत परत सत्ता स्थापन केली. भाजपाने ४५ विरुद्ध ३२ अशा फरकाने विरोधी आघाडीवर मात केली. शहरात कुठल्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने महापौर कोणाचा होईल याकडे सर्वांचेच लक्ष लागले होते परंतु निवडणूक निकालाच्या दिवसापासूनच भारतीय जनता पार्टीने सूक्ष्म नियोजन राबवित राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या तीन नगरसेवकांना आपल्या गळास लावले होते. भाजपाने शहर सुधार आघाडी स्थापन करीत ४४ नगरसेवकांची मोट बांधून आपली स्थिती भक्कम केली होती. त्यात आज भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी पूर्वाश्रमीचे भाजपाई नगरसेवक व तिकीट न मिळाल्याने बंडखोरी करीत निवडून आलेल्या आशिष पवित्रकारांशी आज संपर्क साधित त्यांना आपल्या गटात ओढून घेतले त्यामुळे भाजपाचे संख्याबळ ४५ झाले अशातच एमआयएमच्या तीन नगरसेवकांनी तटस्थ राहण्याची भूमिका घेतली

त्यामुळे भाजपाचा विजय अगदी सहज सोपा झाला महापौरपदी भाजपाच्या शारदा रणजीत खेडकर तर उपमहापौर पदासाठी अमोल सुधाकर गोगे यांची नियुक्ती झाली. बहुमताचा आकडा विश्वास व्यक्त करणाऱ्या काँग्रेस शिवसेना व वंचित या विरोधी आघाडीची संख्या केवळ ३२ वर अडकून पडली. भाजपा आमदार रणधीर सावरकर यांनी आपले सर्वस्व पणाला लावून महापालिकेत परत भाजपाची सत्ता निवडून आणण्यात मोठा वाटा उचलला, निवडून आलेल्या महापौर व उपमहापौर यांचे उपस्थित सर्वांनी स्वागत केले. शहर विकासासाठी आम्ही शहर सुधार आघाडी मार्फत पूर्णपणे कटिबद्ध असल्याची ग्वाही महापौर व उपमहापौर यांनी दिली.



## एमआयएमची तटस्थता कोणाच्या पथ्यावर!

### ♦ नागरिकांच्या डोक्यात अनेक प्रश्नांचे उठले काहूर

प्रतिनिधी ३० जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या आज गुरूवारी झालेल्या महापौर, उपमहापौर पदाच्या निवडणुकीत भाजपाच्या शारदा खेडकर महापौर तर अमोल गोगे उपमहापौर पदावर विराजमान झाल्याने भाजपचे सत्ता स्थापनेचे स्वप्न सत्यात उतरले आहे. या निवडणुकीने अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. सर्वात महत्त्वाचा म्हणजे एमआयएमने तटस्थ राहून काय साध्य केले, त्यांची तटस्थता म्हणजे मूक संमती तर नव्हे, असे अनेक प्रश्न नागरिक दबक्या आवाजात उपस्थित करीत आहेत.

महानगरपालिकेची निवडणूक झाल्यापासून ते महापौर पदाच्या निवडणुकीपर्यंत सर्वत्र अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले होते. आपल्याच पक्षाच्या नगरसेवकांकडे पक्ष संशयित नजरेने बघत असल्याने सर्वत्र गढूळ वातावरण पहायला मिळत होते. याला छोटे-मोठे पक्षच नव्हे तर भाजपासारखा मोठा पक्षही अपवाद नव्हता. कारण शेवटच्या टप्प्यात त्यांनाही आपल्या नगरसेवकांना सुरक्षित स्थळी (निगराणीत) ठेवण्याची गरज का पडावी? काँग्रेसने २१ जागा मिळवूनही केवळ भाजपला रोखण्यासाठी आपला महापौरपदाचा दावा दावणीला बांधत विरोधकांची मोट बांधण्याचा अटोकाट प्रयत्न केला. त्याला वरवर प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत असले तरी आतून काय शिजते, याची कल्पना कोणालाच नव्हती. अनपेक्षितपणे महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपसोबत हातमिळणवी करून भाजपचा सत्ता स्थापनेचा सोपान सुकर करून दिला. तरीही भाजपने 'रिस्क' नको म्हणून आणि वेळेवरच्या घडामोडींवर नजर ठेवत आपल्या सत्तासोबतींनी हालचाल करू नये, याची विशेष खबरदारी घेतल्याने आणि शेवटपर्यंत पक्षाच्या वरिष्ठांनी सर्व घडामोडीवर बारीक लक्ष ठेवल्यानेच त्यांना 'सत्ता सुंदरी'ला प्राप्त करणे सहज सोपे झाले.

याउलट कशात काही नसतानाही इतर पक्षांनी नुसत्या वल्गना करीत 'वातावरण निर्मिती' करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यासाठी आवश्यक असलेला पाठपुरावा, सूक्ष्म नियोजन, वरिष्ठ स्तराचा पाठिंबा न मिळाल्याने त्यांच्या प्रयत्नांना अपेक्षित फळ मिळू शकले नाही.

अकोल्या जिल्ह्यातील अकोट येथील नगर परिषदेच्या निवडणुकीत भाजप अन् एमआयएम युतीने संपूर्ण राज्याचे वातावरण ढवळून निघाले होते. त्यानंतर सारवासारव करण्याचे अनेक प्रयत्न झाले. मात्र नागरिकांचा त्यावर कितपत विश्वास बसला, हा प्रश्नच आहे. त्यामुळे अकोला महानगरपालिकच्या महापौरपदाच्या निवडणुकीत ऐनवेळी एमआयएम कोणती भूमिका घेईल, याचा कोणालाच विश्वास नसल्याने विरोधकांनी जो मोट बांधण्याचा प्रयत्न केला होता, तो म्हणावा तितका मजबूत नव्हता. कारण त्याला विश्वासार्हतेच्या खांबाचा आधारच मिळाला नाही. आणि शेवटी महापौर-उपमहापौर पदाच्या निवडणुकीत एमआयएमने तटस्थ भूमिका घेतल्यामुळे नागरिकांच्या शंकेला खतपाणी मिळत आहे, एवढे मात्र निश्चित.

## महापालिकेतील सत्ता स्थापनेसाठी काँग्रेस आघाडीला अपयश का?

प्रतिनिधी ३० जानेवारी

**अकोला :** अकोला महापालिकेत सत्ता कोण स्थापन करणाऱ्यांकडे सर्वांचेच लक्ष लागून होते. शहर सुधार आघाडी आणि काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट, वंचित बहुजन आदी पक्षाची विरोधी आघाडी मध्ये महापौर पदाबाबत चांगली चुरस दिसून आली. संख्याबळाच्या खेळात आधीच शहर सुधार आघाडीने बाजी मारली होती. परंतु त्याउपरही काँग्रेस आमदार साजिद खान पठाण आणि शिवसेना आमदार नितीन देशमुख सत्ता स्थापन करण्यावर ठाम होते. कोणत्याही परिस्थितीत आमचाच महापौर होईल अशा वल्गना जरी राणा भीमदेवी थाटात विरोधी आघाडीने मारल्या होत्या. त्याला शहर सुधार आघाडीने आपल्या सूक्ष्म नियोजनाने मात दिली. संख्याबळाच्या खेळात कोणताही अनपेक्षित धक्का बसू नये त्यासाठी शहर सुधार आघाडीने आपल्या सर्व नगरसेवकांना हॉटेल सिटी स्पोर्ट्स मध्ये हलवले होते. शहर सुधार आघाडीने संभाव्य फोडाफोडी, संपर्क मोहिमा व दबावतंत्र टाळण्यासाठी हा खबरदारीचा उपाय केला होता. विशेषता भाजपा आमदार रणधीर सावरकर संपूर्ण घडामोडी वर बारीक लक्ष ठेवून होते. महापौर पदाच्या निवडी आधी सुद्धा ते महापालिका समोरच उभे होते. अत्यंत सूक्ष्म नियोजन त्यांनी केले होते. या उपर विरोधी आघाडीमध्ये कसलाच ताळमेळ दिसून आला नाही. केवळ भाजपाकडे सत्ता जाऊ नये या एकमेव उद्देशाने विरोधी एकत्र आले होते. काही राष्ट्रवादीच्या मुस्लिम नगरसेवकांवर भाजपासोबत जाऊ नये म्हणून दबाव तंत्राचा सुद्धा वापर करण्यात आला होता. परंतु त्याला भीक न घालता राष्ट्रवादीच्या शरद पवार आणि अजित पवार गटाच्या नगरसेवकांनी भाजपा सोबतच जाणे पसंत केले. कारण एकतर तीन साडेतीन वर्षानंतर महापालिकेत प्रशासक राज हटून लोकनियुक्त जनप्रतिनिधींचे सरकार येणार होते. अशा वेळेस केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पार्टीचे सरकार असल्याने महापालिकेला मोठ्या प्रमाणात निधी मिळेल असा विश्वास या सर्व नगरसेवकांना होता. म्हणून त्यांनी भाजपा सोबतच जाऊन सत्तेची फळे चाखण्याचा निर्णय घेतला. भाजपाचे ३८ नगरसेवक एकसंध दिसून आल्याने व विरोधी आघाडीत एकमत नसल्याने राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी नगर विकास आघाडी सोबत जाणेच पसंत केले. विरोधी आघाडीच्या नेत्यांची तोंडे तीन दिशेला असल्याने व त्यांच्यात विश्वासार्हता नसल्याने त्यांना आज महापौर पदाच्या निवडणुकीत पराभव स्वीकारावा लागला. एक तर आधी शिवसेना ठाकरे गटाने भाजपासोबत जाण्याची तयारी केली होती. परंतु काही अटी व शर्ती लादल्याने भाजपा शिवसेना ठाकरे गटाचे सूत काही जुळू शकले नाही. त्यामुळे विरोधी आघाडीत आधीच अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले होते. केवळ भाजपाला विरोध या एकमेव मुद्द्यावर विरोधी एकवटले होते. भाजपाला बहुमत न मिळाल्यानंतरही भाजपाने निवडणूक निकालाच्या दिवसापासूनच आपली बाजू भक्कम करण्यास सुरुवात केली होती. मागील दहा ते पंधरा वर्षापासून भाजपाची महापालिकेत सत्ता असल्याने भाजपा नेत्यांना सत्ता स्थापनेच्या खाचाखुचाची चांगलीच माहिती होती. अगदी सूक्ष्म नियोजन आखून त्यांनी आपला विजय निश्चित केला. याउलट काँग्रेस, शिवसेना, आणि वंचित यांनी महापौर पदासाठी एडवोकेट बाळासाहेब आंबेडकर शहरात आल्यानंतर सुरुवात केली होती. परंतु तोपर्यंत उशीर झाला होता. भलेही काँग्रेसचे नेते म्हणत होते की शहरवासीयांनी भाजपा विरोधात निकाल दिला आहे परंतु भाजपाने आपले सूक्ष्म नियोजन राबवून शहर सुधार आघाडी बनवीत आपली बाजू भक्कम केली होती. तर दुसरीकडे विरोधी आघाडीचा विस्कळीतपणा, नियोजनाचा अभाव आणि एकमेकाबद्दल विश्वास नसण्याची भावना त्यांना डुबवून गेली. केवळ नियोजनाच्या आधारे भाजपाने आपले संख्याबळ वाढवीत परत आपली सत्ता महापालिकेत स्थापन केली आहे. काँग्रेसच्या आमदारांनी व वरिष्ठ नेत्यांनी महापालिकेत स्थापनेसाठी कितीही प्रयत्न केले तरी केवळ नियोजनाच्या जोरावरच भाजपाने शहर सुधार आघाडी बनवीत विरोधकांच्या आशेवर पाणी फेरण्याचे काम केले




CLASSIFIED

हॅड्रा फेशियल ३० टक्के ऑफर
३० तारखेपासून २ पर्यंत
ब्यूटीपार्लर क्लासेस सुध्दा
घेतल्या जातील
प्रोफेशनल मेकअप

**विनस ब्यूटी पार्लर**

राधा नगर विनायक नगर, अमरावती
**प्रो.प्रा. प्रीति तायवाडे**
मोबा. ९०२२६०८२३२



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135



CMYK CMYK